रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ३४६
www.ramprahar.com
◆ शनिवार, ४ जुलै २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

खोपोलीतील पाणीपुरवठा आजपासून पूर्ववत/२
मुरुड जंजिरा नगरपालिकेला दोन अग्निशमन वाहने/५
इंग्लंड महिला संघ टी-२० वर्ल्डकप फायनलमध्ये/८


## कोकणासह राज्यात मुसळधार पावसाचा अलर्ट



**पुणे :** राज्यातील अनेक भागांमध्ये जोरदार पाऊस सुरू असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. हवामान विभागाने मुंबई शहरासह रायगड, ठाणे, पालघर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये ४ ते ६ जुलैदरम्यान मुसळधार पावसाचा अंदाज वर्तविला आहे. मध्य महाराष्ट्रातील सातारा, पुणे आणि नाशिक जिल्ह्यांच्या घाट परिसरातही मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता आहे. नागरिकांनी या काळात सतर्क राहावे. विशेषतः सखल भागांमध्ये आणि घाट रस्त्यांवर प्रवास करताना अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. आपत्कालीन परिस्थितीत स्थानिक आपत्कालीन क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून करण्यात येत आहे. राज्यातील संभाव्य पूरस्थिती व इतर आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी संवेदनशील ठिकाणी एनडीआरएफची पथके तैनात करण्यात आली आहेत.

## शाळेच्या ५०० मीटर परिसरात 'एनर्जी ड्रिंक्स'ना बंदी!

### राज्य सरकारकडून निर्बंध; ड्रग्ज विक्रीचीही होणार चौकशी

**मुंबई : प्रतिनिधी**

शाळकरी मुले आणि महाविद्यालयीन तरुणांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या व अतिसेवनामुळे घातक ठरणाऱ्या 'एनर्जी ड्रिंक्स'च्या विक्रीवर राज्य सरकारने निर्बंध लागू केले आहेत. राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांच्या ५०० मीटर परिसरामध्ये या एनर्जी ड्रिंक्सच्या विक्रीवर पूर्णपणे बंदी घालण्याची घोषणा अन्न व औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवाळ यांनी शुक्रवारी (दि.३) विधानसभेत केली.



याचबराबेर शाळा आणि महाविद्यालयांच्या आवारात फ्लेवर पानांच्या नावाखाली होणारी अमली पदार्थांची विक्री आणि भेसळीची उच्चस्तरीय चौकशी केली जाईल, असे ना. झिरवळ यांनी आश्वस्त करत यासाठी सध्या विशेष तपास मोहीम सुरू असल्याचे सभागृहात स्पष्ट केले.

विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात आमदार विक्रम पाचपुते यांनी यासंदर्भात तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. यावर उत्तर देताना मंत्री झिरवाळ यांनी शाळेच्या आवारात विद्यार्थ्यांच्या आरोग्यास हानी पोहचवणारी पेये विकली जात असल्याचे निदर्शनास आल्याचे सांगत ५०० मीटरच्या आत अमली पदार्थांसह सर्व प्रकारच्या एनर्जी ड्रिंक्सवर बंदी घालण्याचे निर्देश प्रशासनाला दिले.

याच मुद्द्याला पुढे नेत आमदार राहुल कुल यांनी ऊर्जा देण्याच्या बहाण्याने शाळा परिसरात चालणाऱ्या इतर पेयांच्या विक्रीकडे लक्ष वेधले. "फ्लेवर पानांच्या नावाखाली शाळकरी मुलांना अमली पदार्थ विकले जात आहेत तसेच दुधाच्या भेसळीत फ्लेवर मिल्क म्हणून जास्त साखर आणि कृत्रिम द्रव्ये वापरून मुलांचे आरोग्य धोक्यात आणले जात आहे, याची सखोल चौकशी व्हावी," अशी मागणी कुल यांनी केली.

यावर स्पष्टीकरण देताना मंत्री झिरवाळ यांनी सांगितले की, या गंभीर बाबींची दखल घेऊन वरिष्ठ अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या अंतर्गत सध्या विशेष तपासणी व कारवाईची मोहीम सुरू आहे. पुढे बोलताना त्यांनी केवळ विक्रीवर निर्बंध घालणेच नव्हे, तर विद्यार्थ्यांमध्ये या पेयांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी विशेष जनजागृती मोहीम राबवण्यात येईल. शाळा, पालक आणि संबंधित विभागांच्या माध्यमातून एनर्जी ड्रिंकच्या अतिसेवनाचे दुष्परिणाम समजावून सांगितले जातील, अशी माहिती दिली.

## रक्तसाठ्याची माहिती अद्ययावत ठेवण्यासंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी यांनी वेधले लक्ष

### माहिती अद्ययावत न करणाऱ्या रक्तकेंद्रांवर दंडात्मक कारवाई -आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यातील रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे यासाठी सर्व रक्तपेढ्यांनी त्यांच्या रक्तसाठ्याची अद्ययावत माहिती दररोज संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे बंधनकारक असतानाही काही रक्तपेढ्यांकडून ही माहिती वेळेवर अद्ययावत केली जात नसल्याचा मुद्दा आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी विधिमंडळात तारांकित प्रश्नाद्वारे उपस्थित केला आणि या महत्त्वाच्या विषयावर शासनाचे लक्ष केंद्रित केले.


विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन

या प्रश्नात मालेगाव शहरातील मालेगाव रक्तपेढी, सेवा रक्तपेढी, अन्सार रक्तपेढी, सामान्य रुग्णालयातील रक्तपेढी तसेच मुंबईतील शासकीय रक्तपेढी आणि सर जे.जे., सेंट जॉर्ज, केईएम, सायन, नायर व राजावाडी रुग्णालयांतील रक्तपेढ्यांमध्ये रक्तसाठा अपुरा पडत असल्याने थॅलेसेमिया रुग्ण, मोठ्या शस्त्रक्रिया आणि आपत्कालीन उपचारांवर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आणून दिले होते. त्यामुळे अनेक रुग्णांना स्वखर्चाने खासगी रक्तपेढ्यांकडे जावे लागत असल्याची बाबही त्यांनी शासनाच्या निदर्शनास आणली.

या प्रश्नाला सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री प्रकाश आबिटकर यांनी आपल्या लेखी उत्तरात सांगितले की, राज्यातील काही रक्तकेंद्रांकडून रक्तसाठ्याची माहिती वेळेवर अद्ययावत केली जात नसल्याचे अंशतः खरे आहे, मात्र या कारणामुळे रुग्ण किंवा त्यांच्या नातेवाइकांना आवश्यक रक्त मिळण्यात अडचणी आल्याची कोणतीही तक्रार राज्य रक्त संक्रमण परिषदेकडे प्राप्त झालेली नाही. मालेगाव (जि. नाशिक) येथील मालेगाव रक्तपेढी, सेवा रक्तपेढी, अन्सार रक्तपेढी, सामान्य रुग्णालयातील रक्तपेढी तसेच मुंबईतील शासकीय रक्तपेढी, सर जे. जे., सेंट जॉर्ज, केईएम, सायन, नायर आणि राजावाडी रुग्णालयांमधील रक्तसाठ्याबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी सांगितले की, जानेवारी ते मे २०२६ या कालावधीत मुंबई व नाशिक जिल्ह्यातील संबंधित रक्तकेंद्रांमध्ये एकूण २५,३३४ युनिट रक्तसाठा उपलब्ध होता. त्यापैकी २४,४४६ युनिट रक्ताचा वापर करण्यात आला असून आवश्यकतेनुसार रक्तपुरवठा करण्यात आला आहे.

थॅलेसेमिया रुग्णांना रक्त उपलब्धतेबाबत आरोग्यमंत्री आबिटकर यांनी स्पष्ट केले की, केंद्र शासनाच्या १२ फेब्रुवारी २०१४च्या निर्देशांनुसार तसेच राज्य शासनाच्या १८ जून २०१४च्या परिपत्रकानुसार सर्व शासकीय व अशासकीय रक्तकेंद्रांनी थॅलेसेमिया रुग्णांना मोफत रक्त उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. राज्यातील रक्तसाठ्याची रिअल-टाइम माहिती उपलब्ध राहावी यासाठी केंद्र शासनाच्या ई-रक्तकोष तसेच राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या संकेतस्थळावर रक्तसाठ्याची माहिती नियमित अद्ययावत करण्याची सुविधा उपलब्ध असून सर्व रक्तकेंद्रांकडून वेळेवर माहिती भरण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जात आहे.

याशिवाय रक्तसाठ्याची माहिती वेळेवर अद्ययावत न करणाऱ्या रक्तकेंद्रांवर शासन निर्णय २ डिसेंबर २०२०नुसार प्रतिदिन एक हजार रुपये दंड आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे. या तरतुदीनुसार सन २०२५-२६मध्ये एकूण ३२ लाख ६७ हजार रुपयांचा दंड संबंधित रक्तकेंद्रांवर आकारण्यात आल्याची माहितीही आरोग्यमंत्र्यांनी लेखी उत्तरात दिली.

## विरार-अलिबाग कॉरिडॉरचा मार्ग मोकळा

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे (एमएसआरडीसी) सुरू असलेल्या विरार ते अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका (मल्टीमॉडेल कॉरिडॉर) प्रकल्पाच्या कामाला आता गती मिळणार आहे. या प्रकल्पाच्या मार्गातील वन जमिनीचा अडथळा दूर करण्यासाठी पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील चंडीगाव येथील ३० हेक्टर शासकीय जमीन वनविभागाकडे हस्तांतरित करण्यास महसूल विभागाने मंजुरी दिली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने शुक्रवारी (दि.३) हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला असून शासनाने या प्रकल्पाला 'निकडीचा सार्वजनिक प्रकल्प' म्हणून मान्यता दिली आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे मुंबई महानगर क्षेत्रातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर कमी होणार असून प्रवासाचा वेळ वाचून दळणवळणाला मोठी गती मिळणार आहे.

या प्रकल्पांतर्गत नवघर (ता.वसई, जि.पालघर) ते चिरनेर (ता.उरण, जि.रायगड) दरम्यान ८० किलोमीटर लांबीचा मार्ग तयार केला जात आहे. या मार्गासाठी वनविभागाची जमीन वापरावी लागणार असल्याने त्याला मंजुरी मिळवण्यासाठी वनविभागाला पर्यायी जमीन देणे आवश्यक होते. त्यानुसार चंडीगाव येथील गट क्र. ७२९ मधील एकूण २५२.९५ हेक्टर क्षेत्रापैकी ३० हेक्टर जमीन वनविभागाला पर्यायी वनीकरणासाठी नाममात्र दराने उपलब्ध करून दिली आहे.

## सीए परीक्षेत साक्षी जैन प्रथम

**नाशिक : प्रतिनिधी**

आयसीएआय अर्थात द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडियाकडून घेण्यात आलेल्या सीए फाउंडेशन परीक्षेत नाशिकची साक्षी जैन देशात पहिली आली आहे. तिने ४००पैकी ३७१ गुण मिळवून ९२.७५ टक्क्यांसह पहिला क्रमांक पटकावला आहे.

चंद्रपूरच्या अयानब्बास अजानी याने ९१.७५ टक्के मिळवून दुसरा, तर पुण्याची राधा उन्मेश मुळे हिने ९१.२५ टक्के मिळवत तिसरा क्रमांक प्राप्त केला आहे.

## आता दुधात भेसळ करणारे तुकाराम मुंढेंच्या रडारवर!

**मुंबई : प्रतिनिधी**

दूध आणि दुग्धजन्य पदार्थांत होणारी भेसळ रोखण्यासाठी राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. ज्याप्रकारे हॉटेल आणि रेस्टॉरंटच्या बाबतीत



सूचना देण्यात आल्या होत्या; त्याप्रमाणेच आता दूध भेसळीच्या विरोधात कठोर पावले उचलली जाणार असल्याची माहिती मुंढे यांनी शुक्रवारी (दि.३) पत्रकार परिषदेद्वारे दिली.

यामध्ये दूध संकलन केंद्र, दूध शीतकरण केंद्र, दुग्ध प्रक्रिया युनिट्स व उत्पादक, पॅकर्स आणि फिलिंग स्टेशन, वितरक, वाहतूकदार, घाऊक विक्रेते, किरकोळ विक्रेते यांना सन २०११चे परवाना-नोंदणीचे मानक लागू आहेत. अन्न उत्पादन मानके व संयोजके तसेच दूषके, अवशेष याचे नियम लागू असल्याचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सांगितले. यात सुटे दूध विक्रेतेही समाविष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## निवडक

### भारताचे पहिले खासगी रॉकेट 'विक्रम-१'अवकाशात झेपावणार

**श्रीहरिकोटा :** भारतातील पहिली स्पेस-टेक युनिकॉर्न १.१ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त मूल्य असलेली कंपनी 'स्कायरूट एरोस्पेस' आपले पहिले खासगी ऑर्बिटल रॉकेट 'विक्रम-१' लाँच करण्यासाठी सज्ज झाली आहे. आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून हे रॉकेट प्रक्षेपित केले जाईल. या मोहिमेला 'मिशन आगमन' असे नाव देण्यात आले असून यासाठी १२ जुलै ते ४ ऑगस्टदरम्यानचा काळ निश्चित करण्यात आला आहे.

### आरोपी सिया आणि चेतनची न्यायालयीन कोठडीत रवानगी

**पुणे :** बहुचर्चित केतन अग्रवाल हत्याकांडप्रकरणी मुख्य आरोपी सिया गोयल आणि चेतन चौधरी यांना वडगाव मावळ न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. यावेळी आरोपींची नार्को टेस्ट करण्याची मागणी कोर्टाने नाकारली. आता तपासाची पुढील प्रक्रिया न्यायालयीन आदेश आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे सुरू राहणार आहे.

## आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत 'सीकेटी'ची बाजी

### मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते गौरव; लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडूनही कौतुक





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत आयोजित पहिल्या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाने ऐतिहासिक कामगिरी बजावली आहे. या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत सीकेटी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'कीचकवध पुन्हा' या एकांकिकेने मुंबई विभागातून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.

केवळ एकांकिकाच नव्हे, तर सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनासाठी प्रणव शेडगे, सर्वोत्कृष्ट संगीतासाठी अखिलेश, सुशांत, पीयूष व भूमी, सर्वोत्कृष्ट वेशभूषेसाठी अनामिका कांबळे आणि सर्वोत्कृष्ट रंगभूषेसाठी दिक्षिता पाटील यांनी प्रथम पारितोषिक जिंकून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. विद्यार्थ्यांच्या या यशाची दखल घेत राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी स्वतः पारितोषिक देऊन त्यांचा गौरव केला.

यासोबतच ६४व्या हौशी मराठी राज्य नाट्य स्पर्धेच्या ठाणे विभाग प्राथमिक फेरीतही पनवेलच्या कलाकारांनी अभिनय आणि तांत्रिक कौशल्याची चुणूक दाखवली. या स्पर्धेत श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे 'नारायणी' हे दोन अंकी नाटक सादर करण्यात आले होते. प्राथमिक फेरीच्या निकालात या नाटकाला विविध विभागांत भरघोस पारितोषिके मिळाली. यामध्ये अभिनय गुणवत्तेसाठी स्त्री पात्रात सानिका पाटील आणि पुरुष पात्रात क्षितिज गायकवाड यांनी बाजी मारली. तांत्रिक विभागात सर्वोत्कृष्ट प्रकाश योजनेसाठी श्याम चव्हाण यांना प्रथम क्रमांक, सर्वोत्कृष्ट रंगभूषा आणि वेशभूषेसाठी रितूपर्ण कीर्तोनिया यांना द्वितीय क्रमांक, सर्वोत्कृष्ट संगीतासाठी गणेश जगताप यांना द्वितीय क्रमांक, तर सर्वोत्कृष्ट नेपथ्यासाठी रितूपर्ण, रोहित देशमुख आणि आर्यन अन्सारी यांना तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे.

एकांकिका आणि राज्य नाट्य स्पर्धा अशा दोन्ही स्तरांवर पनवेलच्या कलाकारांनी मिळवलेल्या या देदीप्यमान यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सर्व विजेत्या कलाकारांचे, दिग्दर्शकांचे आणि तंत्रज्ञांचे अभिनंदन व कौतुक केले.

## पांडवकडा धबधबा, ओवेकॅम्प धरण, तळोजा जेल तलाव परिसरात पर्यटकांना बंदी

**पनवेल : वार्ताहर**

पावसाळ्यात होणारे अपघात आणि पर्यटकांचे बुडून मृत्यू रोखण्यासाठी नवी मुंबई पोलीस प्रशासनाने कडक पाऊल उचलले आहे. खारघर आणि तळोजा परिसरातील निसर्गरम्य, मात्र तितक्याच धोकादायक ठरणाऱ्या प्रमुख पर्यटन स्थळांवर पर्यटकांना जाण्यास पूर्णपणे बंदी घालण्यात आली असून ही सर्व ठिकाणे प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आली आहेत.

दरवर्षी पावसाळा सुरू झाला की खारघरमधील डोंगररांगा आणि धबधब्यांवर आनंद घेण्यासाठी मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईतील पर्यटकांची प्रचंड गर्दी होते, मात्र अनेकदा अतिउत्साहाच्या भरात किंवा निष्काळजीपणामुळे दुर्घटना घडतात. या पार्श्वभूमीवर खारघर पांडवकडा, चाफेवाडी, फणसवाडी, ड्रायव्हिंग रेंज सेक्टर ५, ओवेकॅम्प धरण, तळोजा जेलसमोरील डोंगर आणि तलाव या ठिकाणी पर्यटक गंभीर जखमी होण्याच्या तसेच पाण्यात बुडून जीव गमावण्याच्या अनेक दुर्दैवी घटना यापूर्वी घडल्या आहेत. नागरिकांच्या सुरक्षिततेचा व जीवाचा विचार करून पोलीस प्रशासनाने येथे बंदी घातली आहे, असे खारघरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जोशी यांनी सांगितले.

## अलिबागमध्ये बंद घरात गुटख्याचा साठा जप्त

**अलिबाग : प्रतिनिधी**

**एकजण अटकेत**

अलिबाग शहरालगतच्या खंडाळा गावातील संगम परिसरात एका बंद घरात साठवून ठेवलेला प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि सुगंधित तंबाखूचा साठा अन्न व औषध प्रशासन तसेच अलिबाग पोलिसांनी जप्त केला. या संयुक्त कारवाईत एक लाख ३१ हजार ३६१ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून अमोल रवींद्र किनगे याला अटक करण्यात आली आहे.

अन्न व औषध प्रशासनाच्या पेण कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त कार्यालयातील प्रथमेश माने यांच्या पथकाला खंडाळा येथील सुवर्णा हजारे व सुषमा कांदळगावकर यांच्या मालकीच्या घरात प्रतिबंधित सुगंधित पानमसाला, गुटखा, तंबाखूचा साठा असल्याची माहिती मिळाली होती. तेथे छापा टाकण्यात आला. तपासणीदरम्यान प्रतिबंधित गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखूचा साठा आढळून आला. कारवाईत प्रीमियम रजनीगंधा फ्लेवर्ड पान मसाला, तुळसी पान मसाला, केशरयुक्त विमल पान मसाला (किंग बॅंक व किंग पॅक), व्ही-१ बिग टोबॅको तसेच सुगंधित तंबाखूचा साठा जप्त करण्यात आला. या मालामध्ये एक हजार ३४२ पाऊच व ६६९ पाकिटांचा समावेश असून त्याची एकूण किंमत एक लाख ३१ हजार ३६१ रुपये इतकी आहे. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## भुशी डॅम भरून वाहू लागला!

### लोणावळ्यात वर्षा पर्यटनाला येणार बहर



**लोणावळा : प्रतिनिधी**

लोणावळ्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे येथील प्रमुख आकर्षण असलेले भुशी धरण शुक्रवारी (दि.३) सकाळी ओव्हरफ्लो झाले. धरणाच्या सांडव्यावरून पाण्याचे शुभ्र प्रवाह पायऱ्यांवरून वाहू लागल्याने पर्यटकांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून स्थानिक व्यावसायिकांच्याही चेहऱ्यावर समाधान झळकले.

अनेक दिवसांपासून भुशी धरण भरून वाहण्याची वाट पाहणाऱ्या पर्यटकांची अखेर प्रतीक्षा संपली. भुशी धरण ओव्हरफ्लो झाल्याने लोणावळ्यातील वर्षा पर्यटनाला आता खऱ्या अर्थाने सुरुवात झाली आहे. आगामी शनिवार-रविवारच्या सुट्टीत मुंबई, पुणे आणि राज्यातील विविध भागांतून मोठ्या प्रमाणावर पर्यटक लोणावळ्याकडे आकर्षित होण्याची शक्यता आहे. त्यामुळे स्थानिक हॉटेल, रेस्टॉरंट, खाद्यपदार्थ विक्रेते, पार्किंग व्यावसायिक तसेच लहान-मोठ्या व्यवसायांमध्येही आनंदाचे वातावरण आहे.

दरम्यान, प्रशासनाने पर्यटकांना वाहत्या पाण्यात खोलवर जाणे, धोकादायक ठिकाणी सेल्फी काढणे आणि सुरक्षेच्या सूचनांकडे दुर्लक्ष न करण्याचे आवाहन केले आहे. पावसाचा जोर कायम असल्याने आवश्यक ती खबरदारी घेऊनच पर्यटनाचा आनंद घ्यावा, असेही सूचित करण्यात आले आहे.

## आंबेनळी घाट ६ जुलैपर्यंत वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद

**अलिबाग : प्रतिनिधी**

पावसाळ्यात अतिवृष्टी, भूस्खलन, दरड कोसळणे तसेच सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने उद्भवणारा धोका लक्षात घेऊन पोलादपूर-महाबळेश्वरला जोडणारा आंबेनळी घाट राज्य महामार्ग ३ ते ६ जुलै या कालावधीत सलग चार दिवस सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद ठेवण्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी किशन जावळे यांनी जारी केले आहेत.

महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या कार्यकारी अभियंत्यांनी सादर केलेल्या अहवालानुसार आंबेनळी घाट मार्गावरील तीव्र उतार, खोल दऱ्या, नैसर्गिक जलप्रवाह, विदिर्ण झालेले बेसॉल्ट खडक, अस्थिर मातीचे थर आणि दाट वनक्षेत्र यामुळे पावसाळ्यात हा मार्ग अत्यंत धोकादायक बनतो. यापूर्वीही प्रतिकूल हवामानाच्या परिस्थितीत आंबेनळी घाटात भूस्खलन, दरड कोसळणे, वृक्ष पडणे व वाहतूक विस्कळीत होण्याच्या घटना घडल्या असून सार्वजनिक सुरक्षिततेला प्राधान्य देत वेळोवेळी घाटबंदीचे आदेश निर्गमित करण्यात आले होते. त्यामुळे संभाव्य जीवितहानी व अपघात टाळण्यास मदत झाली.

पोलादपूर तहसीलदार तथा तालुका आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अध्यक्ष यांनीही ३ ते ६ जुलै या कालावधीत आंबेनळी घाट सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद ठेवण्याची शिफारस केली होती. याचबरोबर रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी अवजड वाहतूक पूर्णपणे बंद ठेवणे आवश्यक असल्याचे तसेच ऑरेंज व रेड अॅलर्टच्या कालावधीत हलक्या वाहनांनाही प्रवेश बंद ठेवण्याबाबत अभिप्राय सादर केला होता.

# ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत दाखल गुन्ह्यांतील दोषसिद्धीचे प्रमाण वाढवा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक अर्थात 'ॲट्रॉसिटी' कायद्यांतर्गत दाखल गुन्ह्यांमध्ये दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्यात यावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान भवन येथे अनुसूचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम अंमलबजावणीसाठी गठीत राज्यस्तरीय दक्षता व संनियंत्रण समितीच्या बैठकीत दिले.

या कायद्यासारख्या विशेष कायद्यामध्ये सरकारी वकिलांमार्फत दोषसिद्धी वाढविण्यासाठी करण्यात आलेल्या कार्याचा उल्लेख त्यांच्या मूल्यमापनात करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. बैठकीस खासदार हेमंत सवरा यांच्यासह समितीमधील आमदार उपस्थित होते.

भारतीय न्याय संहितेमध्ये कुठल्याही खटल्यात दोन वेळा तडजोड किंवा समायोजन करण्याची तरतूद असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यातही या तरतुदींवर आधारित कायद्यात सुधारणा करण्यासंदर्भातील प्रस्ताव सादर करावा. विशेष कायद्यांमध्ये दोन वेळा समायोजनाचीच तरतूद असावी. जेणेकरून अशा गुन्ह्यांमध्ये आरोपी सुटणार नाहीत. राज्यातील ज्या जिल्ह्यांमध्ये ॲट्रॉसिटीचे गुन्हे



जास्त आहेत, त्या ठिकाणी जलदगती न्यायालय उभारावीत. या न्यायालयांच्या माध्यमातून खटल्यांच्या निकालांना गती मिळेल. त्यामुळे पीडितांना गुन्हा दाखल झाल्यापासून कमी कालावधीत न्याय मिळणार असल्याचा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

गृह विभागाच्या मार्वल संस्थेच्या माध्यमातून ॲट्रॉसिटी गुन्ह्यांमधील दोषसिद्धी न होण्याची कारणे शोधून गुन्हा दाखल झाल्यापासून ते न्यायालयामध्ये खटला दाखल करेपर्यंत विशिष्ट कार्य पद्धती तयार करण्यात यावी. यामध्ये तकलादू पुरावे, चेन ऑफ इव्हेंट, साक्षीदार फितूर होणे या बाबींचा अभ्यास करून ही विशिष्ट कार्यपद्धती असावी. या कायद्याअंतर्गत तपास अधिकारी हा उपविभागीय पोलीस अधिकारी असतो. त्यामुळे राज्यभरात घेण्यात येणाऱ्या कार्यशाळांमध्ये प्रकर्षाने उपविभागीय पोलीस अधिकारी स्तरावर प्रशिक्षण घेण्यात यावीत. खटल्यांच्या न्यायालयीन सुनावणीची भारतीय न्यायसंहितेमधील तरतुदीनुसार व्हिडिओ चित्रीकरण करावे, जेणेकरून साक्षीदार फितूर होण्याचे प्रमाण कमी होईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यात सोलापूर, अहिल्यानगर, परभणी, नांदेड व यवतमाळ जिल्ह्यांमध्ये ॲट्रॉसिटी कायद्याअंतर्गत दाखल होणाऱ्या गुन्ह्यांचे प्रमाण जास्त असण्यासंदर्भात पोलीस यंत्रणेने यामागील कारणे शोधावीत, याबाबत अधिक खोलवर चौकशी करून गुन्ह्यांचा शोध घेत अहवाल सादर करावा. कुठेही खोटे गुन्हे असल्यास तपासाअंती ते दाखल करण्यात येऊ नयेत. या कायद्याअंतर्गत दाखल खटल्यांच्या सुनावणीदरम्यान खून, बलात्कार, दरोडे आदी गंभीर गुन्हे प्रकारातील साक्षीदारांचे संरक्षण करावे. त्यासाठी साक्षीदार संरक्षण कार्यक्रम राबविण्यात यावा.

जिल्हास्तरावर कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करीत सरकारी वकिलांशी संवाद वाढवावा. या कायद्याच्या अंमलबजावणी संबंधित असलेल्या सर्व यंत्रणांची कार्यशाळा घेऊन त्यांना प्रशिक्षित करावे. तसेच कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावर मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली व पोलीस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली वर्षातून सहा महिन्याच्या अंतराने बैठक आयोजित करण्यात यावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

बैठकीत सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी सादरीकरण केले. मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, पोलीस महासंचालक सदानंद दाते, प्रधान सचिव दिलीप घुमरे, सचिव विजय वाघमारे, अपर पोलीस महासंचालक अश्विती दोरजे, समाज कल्याण आयुक्त दीपा मुधोळ आदी उपस्थित होते.

# मुंबई-गोवा महामार्गावर पाणी

**पाली : प्रतिनिधी**



रायगड जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या सलग मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून अनेक ठिकाणी पाणी साचल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील काही सखल भागांमध्ये पावसाचे पाणी साचल्याने वाहनांची वाहतूक संथ गतीने सुरू आहे.

सतत कोसळणाऱ्या पावसामुळे जिल्ह्यातील प्रमुख नद्या दुथडी भरून वाहत आहेत. नदीकाठच्या गावांमध्ये प्रशासनाकडून विशेष सतर्कता बाळगण्यात येत असून पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नागोठणे रेल्वे पूल,

## वाहतूक मंदावली


बायपास व माणगाव या ठिकाणी महामार्गावर पाणी साचत आहे. त्यामुळे वाहतुकीवर परिणाम होत आहे.अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन, महसूल विभाग, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा, पोलीस विभाग तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांना सज्ज राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

दरडप्रवण क्षेत्रे, नदीकाठची गावे आणि सागरी किनारपट्टीवरील भागांवर विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे.हवामान विभागाने जिल्ह्यासाठी अतिवृष्टीचा इशारा दिल्याने प्रशासन अलर्ट मोडवर आले असून नागरिकांनी अनावश्यक प्रवास टाळावा, नदी-नाल्यांच्या परिसरात जाणे टाळावे तसेच प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, सततच्या पावसामुळे शेती, वाहतूक आणि दैनंदिन व्यवहारांवर परिणाम होत असून पुढील काही तास जिल्ह्यात मुसळधार पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यतादेखील व्यक्त करण्यात येत आहे.

# तळा-तारणे येथे डम्परचा अपघात; चालक जखमी

**तळा : प्रतिनिधी**

इंदापूर-आगरदांडा रस्त्यावरील तळा शहराजवळील तारणे येथील अवघड वळणावर गुरुवारी (दि. २) सायंकाळी साडेसहाच्या सुमारास टाटा हायवा डम्परचा भीषण अपघात झाला. बेदरकारपणे आगरदांडाकडे जाणाऱ्या एमएच ०६ सीडब्ल्यू ४९६४ क्रमांकाच्या डम्परने वळणावर उजव्या बाजूला जाऊन लाईटच्या पोलला ठोकर मारली आणि डम्पर उलटला.



या अपघातात चालक डम्परमध्ये अडकून पडला होता. नागरिक व प्रशासनाच्या मदतीने जेसीबीच्या साहाय्याने डम्पर हालवून चालकाची सुटका करण्यात आली. अपघातात चालक जखमी झाला असून त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. वेळीच मदत मिळाल्याने चालकाचा प्राण वाचला. याप्रकरणी तळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तारणे येथील या वळणावर वर्षभरात चार अपघात घडल्याच्या घटना घडल्या आहेत. वारंवार होणारे अपघात टाळण्यासाठी बांधकाम विभागाने येथे तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

# माथेरानमध्ये मतदार यादी पुनरीक्षणाला सुरुवात

**माथेरान : बातमीदार**

मतदार यादी पुनरीक्षण राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत माथेरान शहरात मतदार यादी पुनरीक्षण कार्यक्रमाला सुरुवात झाली आहे. ३० जून ते २९ जुलै या कालावधीत मतदार यादीची पडताळणी केली जाणार आहे.

या मोहिमेत मतदाराला एसआयआर फॉर्म भरावा लागणार आहे. त्यासाठी मतदाराचे दोन पासपोर्ट साईज फोटो, आधार कार्डसारखी कागदपत्रे तयार ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. एसआयआर फॉर्म ज्या मतदाराचा भरला जाणार नाही, अशा मतदाराचे नाव मतदार यादीतून कमी होईल. यासाठी निवडणूक आयोगाने यादी क्रमांकानुसार, विभागानुसार बीएलओ नेमले असून मतदारांनी बीएलओंना सहकार्य करून राष्ट्रीय कामात आपली जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन माथेरान महसूल अधीक्षक सुरेंद्रसिंह ठाकूर यांनी केले आहे.

# कृषिदिनी वऱ्हाड-जांभूळपाडा ग्रामपंचायतीचा हरित ग्राम संकल्प; परिसरात वृक्षारोपण



**पाली : प्रतिनिधी**

कृषिदिनानिमित्त ग्रुप ग्रामपंचायत वऱ्हाड-जांभूळपाडा येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धन, हरित ग्राम संकल्पना आणि वृक्षलागवडीचे महत्त्व जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मान्यवरांच्या हस्ते विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी वृक्षारोपणाचे महत्त्व सांगताना नमूद केले की, सध्याचे वाढते तापमान, हवामानातील वेगाने होणारे बदल आणि पर्यावरणाचा ढासळणारा समतोल पाहता वृक्षारोपण करणे ही काळाची गरज बनली आहे.

केवळ झाडे लावणे पुरेसे नसून त्यांचे योग्य संगोपन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत उपस्थितांनी पर्यावरण संवर्धनासाठी अधिकाधिक वृक्ष लागवड करून त्यांचे रक्षण करण्याचा संकल्प केला.कृषी दिनाचे औचित्य साधून राबविण्यात आलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे संपूर्ण परिसरातून कौतुक होत आहे. ग्रामस्थांनी या मोहिमेचे स्वागत केले असून, पर्यावरण रक्षणासाठी अशा प्रकारच्या उपक्रमांची सातत्याने गरज असल्याचे मत व्यक्त केले. सर्व उपस्थितांच्या निर्धाराने हा कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि सकारात्मक वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाला रायगड जिल्हा परिषद सदस्या शर्मिला बोडके, सुधागड तालुका पंचायत समिती सभापती जागृती मानकर, पंचायत समिती उपसभापती संदेश शेवाळे आणि पंचायत समिती सदस्या प्रणिता परदेशी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच गटविकास अधिकारी लता मोहिते, सहाय्यक गटविकास अधिकारी महादेव शिंदे आणि कृषी विस्तार अधिकारी उपस्थित होते. स्थानिक पातळीवरून सरपंच पांडुरंग लिंबाजी शेंडे, उपसरपंच अरुणा गिरीश दळवी, ग्रामपंचायत अधिकारी सचिन बाळाजी केंद्रे यांच्यासह इतर ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

# पनवेलच्या जोशी आळी परिसरात स्वच्छता मोहीम

**पनवेल : वार्ताहर**

भाजप पनवेल व्यापारी संघ अध्यक्ष संजय जैन यांनी तत्परतेने मदतीचा हात देत जोशी आळी व परिसरात स्वच्छता मोहीम राबवून पावसामुळे तुंबलेले नाले व गटारे साफ करून घेतली.

यासंदर्भात त्या भागातील व्यापारी व रहिवाशांनी मुसळधार पावसामुळे नाले व गटारे तुंबल्याने याबाबतची माहिती जैन यांना देताच त्यांनी पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली त्या भागात स्वच्छता मोहीम राबवून सदर परिसर मोकळा करून दिल्याने तेथील व्यापारी व रहिवाशांनी त्यांचे आभार मानले आहेत.



# खोपोलीत आजपासून पाणीपुरवठा होणार पूर्ववत!

## उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांची माहिती

**खोपोली : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून पाऊस समाधानकारक असून नदीला भरपूर पाणी आल्याने खोपोली शहरातील पाणीपुरवठा शनिवार (दि. ४) पासून पूर्वीप्रमाणे दिवसातून दोन वेळा सुरू राहणार असल्याची माहिती पाणीपुरवठा सभापती व उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांनी दिली.

जून महिन्यात पाऊस लांबल्यामुळे शहरात एकच वेळ पाणीपुरवठा सुरू होता. त्यामुळे अनेक भागांत अपुरा पाणीपुरवठा होत होता व नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाला होता, मात्र जुलै महिन्यापासून पाऊस बऱ्यापैकी पडत असल्याने उपनगराध्यक्षांनी नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील व पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांशी चर्चा करून ४ जुलैपासून दोन वेळा पाणीपुरवठा करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याचे साबळे यांनी सांगितले. या घोषणेचे खोपोली शहरात सर्व स्तरांतून स्वागत करण्यात येत आहे.

# पनवेल महापालिका क्षेत्रातील जि.प. शाळांच्या हस्तांतरणाबाबत सकारात्मक चर्चा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील जिल्हा परिषद शाळांचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण करण्याबाबत महापौर नितीन पाटील व रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली.

या बैठकीस रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे, उपमहापौर प्रमिला पाटील, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, जिल्हा परिषद शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे, सभागृहनेते प्रकाश बिनेदार, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, मनपा शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, रायगड जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी ललिता दहितुले यांच्यासह अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. बैठकीच्या सुरुवातीला पनवेल



विधानसभा आमदार प्रशांत ठाकूर व्हीसीद्वारे उपस्थित होते. त्यांनी हा विषय प्रलंबित न ठेवता चर्चा करून तातडीने प्रश्न सोडविण्याबाबत पदाधिकारी व अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

शाळांच्या हस्तांतरण प्रक्रियेसंदर्भातील विविध प्रशासकीय, कायदेशीर व तांत्रिक बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. शाळांची सद्यस्थिती पाहता विद्यार्थीहितासाठी लवकरात लवकर निर्णय घेण्याबाबत एकमत झाले. जिल्हा परिषद शाळांचे हस्तांतरण नियमानुसार पूर्ण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याबाबत पनवेल महानगरपालिका व रायगड जिल्हा परिषद सकारात्मक असून दोन्ही स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे लवकरच तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करून अंतिम निर्णय घेण्याचे निश्चित करण्यात आले.

शिक्षक हस्तांतरणाबाबत सकारात्मक चर्चा झाली. नियमानुसार निर्णय घेऊन तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करण्याचे निश्चित झाले. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित, शिक्षक व कर्मचाऱ्यांचे प्रशासकीय प्रश्न तसेच भविष्यातील विकासकामे याबाबतही सविस्तर चर्चा करण्यात आली.

# पनवेलमध्ये लोककल्याण मेळावा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेंतर्गत लाभार्थ्यांपर्यंत योजनेचा अधिक व्यापक लाभ पोहचवणे, नव्या पथविक्रेत्यांचा समावेश करणे, वित्तीय व्यवहारास चालना देणे तसेच डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देणे या उद्देशाने आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार पनवेल महानगरपालिकेच्या दीनदयाळ अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत गुरुवारी (दि. २) सुवर्ण दुर्ग कामोठे प्रभाग कार्यालय येथे लोककल्याण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

उपायुक्त अभिषेक पराडकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा मेळावा घेण्यात आला. मेळाव्याला सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने उपस्थित होत्या. तसेच यावेळी मार्गदर्शक म्हणून जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक विजय कुलकर्णी, अन्न सुरक्षा अधिकारी सचिन आढाव उपस्थित होते. यावेळी विजय कुलकर्णी यांनी बँकेच्या विविध योजनांची माहिती




दिली. प्रधानमंत्री आत्मनिर्भर निधीचा जास्तीत जास्त फेरीवाल्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करून यासाठी बँकेचे सहकार्य मिळेल, असे आश्वासन त्यांनी दिले. तसेच डिजिटल व्यवहारांबाबत मार्गदर्शन केले.

अन्न सुरक्षा अधिकारी सचिन आढाव यांनी अन्न सुरक्षा कशी राखावी याबाबत पथविक्रेत्यांना माहिती दिली. प्रत्येक अन्नपदार्थ विक्री करणाऱ्या पथविक्रेत्यांनी स्वतःचा अन्न परवाना काढणे गरजेचे असल्याचे सांगून परवाना काढण्याबाबत मार्गदर्शन केले. तसेच अन्नपदार्थ विक्री करताना घ्यावयाच्या काळजीबाबतही त्यांनी माहिती दिली. प्रास्ताविकात व्यवस्थापक विनया म्हात्रे यांनी पनवेल महानगरपालिकेकडून प्रधानमंत्री आत्मनिर्भर निधी अंतर्गत आतापर्यंत केलेल्या कामाचा आढावा सादर केला.

आभार प्रदर्शन व्यवस्थापक नवनाथ थोरात यांनी केले. मेळाव्याला बँक ऑफ इंडिया कामोठे व कळंबोली शाखेचे प्रतिनिधी, बँक ऑफ महाराष्ट्र कामोठेचे प्रतिनिधी, दीनदयाळ अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# वाहतूक नियमांचे पालन करा, अन्यथा कारवाई!

## पनवेल आरटीओचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पर्यावरण रक्षणासाठी आणि कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी सर्व नागरिकांनी आपल्या वाहनांचे प्रदूषण प्रमाणपत्र त्वरित अद्ययावत ठेवावे आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेलचे प्रादेशिक परिवहन अधिकारी जयंत चव्हाण यांनी केले आहे.



केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम ११५ व ११६ अंतर्गत वाहनामधून उत्सर्जित होणाऱ्या धुरामुळे होणारे प्रदूषण व त्याबाबतच्या कायदेशीर तरतुदी स्पष्ट करण्यात आल्या आहेत. वाहनांमुळे होणाऱ्या वायू प्रदूषणाचा थेट आणि गंभीर परिणाम मानवी आरोग्य व पर्यावरणावर होत असल्याने उच्च न्यायालयानेदेखील यासंदर्भात अत्यंत कडक निर्देश दिले आहेत. केंद्रीय मोटार वाहन नियम आणि न्यायालयाच्या निर्देशानुसार नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी सर्व वाहनधारकांनी आपल्या वाहनांची निर्धारीत कालावधीनंतर मान्यताप्राप्त संगणकीय प्रदूषण नियंत्रण केंद्रांमार्फत ऑनलाइन पद्धतीने प्रदूषण नियंत्रण चाचणी करून घेणे व त्याचे वैध प्रमाणपत्र सोबत बाळगणे कायदेशीररीत्या अनिवार्य आहे.

सर्व वाहनमालक आणि चालकांनी जर वाहनाचे वायू प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र अद्ययावत नसल्यास तसेच रस्त्यांवर संशयास्पद वाटणाऱ्या प्रदूषक वाहनांवर प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल या कार्यालयाच्या वायूवेग पथकांद्वारे मोटार वाहन कायदा, १९८८ आणि मोटार वाहन नियम, १९८९ अंतर्गत विविध कलमांखाली कडक दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात येईल. या कार्यालयाच्या वायूवेग पथकामार्फत एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत एकूण सहा हजार ५९८ वाहनांवर कारवाई करून १३.१९ कोटी रुपये इतका दंड आकारण्यात आला आहे. तसेच एप्रिल २०२६ ते जून २०२६ या कालावधीत एकूण १२६६ वाहनांवर कारवाई करून २५.३२ लाखांचा दंड आकारण्यात आला आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते 'झेनिथ हाऊस'च्या कार्यालयाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**





झेनिथ कन्स्ट्रक्शन कंपनीच्या नवीन झेनिथ हाऊस या सुसज्ज कार्यालयाचा भव्य उद्घाटन सोहळा नुकताच अत्यंत उत्साहात पार पडला. नवीन पनवेल येथील सेक्टर ६, सेंट जोसेफ हायस्कूलजवळ उभारण्यात आलेल्या या नूतन कार्यालयाचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यालयाचे उद्घाटन केल्यानंतर उपस्थितांना मार्गदर्शन करताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पाटील कुटुंबीयांना मनापासून शुभेच्छा दिल्या. ज्याप्रमाणे झेनिथ कंपनीचे संस्थापक रमेश पाटील यांनी हा उद्योग निष्ठेने सांभाळला, त्याच पावलावर पाऊल ठेवून त्यांची मुले आज सर्वांना सोबत घेऊन काम करीत आहेत, अशा शब्दांत त्यांनी कौतुक केले. पुढे बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, एखाद्या अदृश्य शक्तीप्रमाणे आम्ही नेहमी झेनिथ परिवारासोबत खंबीरपणे उभे आहोत. उद्योगामध्ये सर्वांना सोबत घेऊन काम करा व आपले नाव मोठे करा, तुमचे भविष्य उज्ज्वल आहे, अशा शब्दांत त्यांनी झेनिथला आशीर्वाद दिले. दरम्यान, आमदार प्रशांत ठाकूर यांनी कार्यालयाला सदिच्छा भेट देऊन पाटील कुटुंबीयांना आणि झेनिथ कंपनीला भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

१९९७मध्ये संस्थापक कै. रमेशशेठ पाटील यांनी हा व्यवसाय सुरू केला. आज त्यांची तीन मुले महेश पाटील, जितेश पाटील व तेजस पाटील व्यवसाय यशस्वीपणे सांभाळत आहेत. २९ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त सोहळा आयोजिण्यात आला होता. उद्घाटनप्रसंगी माजी आमदार दीपक साळुंखे, भाजपचे रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, वाय. टी. देशमुख, महापौर नितीन पाटील, सभागृहनेते प्रकाश बिनेदार, माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, नगरसेवक अजय बहिरा, सुमित झुंझारराव, प्रवीण पाटील, गणेश कडू, विजय खानावकर, अमर पाटील, नगरसेविका प्रतिभा भोईर, माजी नगरसेवक अनिल भगत, तेजस कांडपिळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# सीकेटी इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत सुयश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सीकेटी इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या विद्यालयाची देदीप्यमान परंपरा कायम राखली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या पूर्व उच्च प्राथमिक आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत या विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत बाजी मारली आहे.



यामध्ये ५वीच्या सात विद्यार्थ्यांनी आणि ८वीच्या चार विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळवून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे विशेष अभिनंदन केले असून सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी मुख्याध्यापिका स्वाती काळे उपस्थित होत्या.

५वीमधून पल्लव म्हात्रे, सौम्या पाटील, सार्थक पवार, एशानी वराल, रुत्वी देसाई, अन्वीत शेवाळे व विभावरी पवार या सात विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली. ८ वीमधून शर्वरी जाधव, आयुष म्हात्रे, मल्हार परब आणि सेजल शेळके या चार गुणवंत विद्यार्थ्यांनी या परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविले आहे.

# लंडन ते पंढरपूर ग्लोबल वारीचे कळंबोली, कामोठ्यात जोरदार स्वागत

**कळंबोली : प्रतिनिधी**

युनायटेड किंगडम (यूके) येथील लंडनमधून प्रारंभ झालेली पहिली 'लंडन ते पंढरपूर ग्लोबल वारी २०२६' ११ देशांचा प्रवास पूर्ण करून भारतात दाखल झाली असून पुढील प्रवासासाठी मार्गस्थ होत असताना कळंबोली-कामोठे येथे या ऐतिहासिक वारीचे गुरुवारी (दि. २) उत्साहपूर्ण, भक्तिमय वातावरणात स्वागत करण्यात आले.



कामोठे पुलाजवळ आयोजित स्वागत सोहळ्यात विठ्ठल नामघोष, टाळ-मृदंगाचा गजर आणि फटाक्यांच्या आतषबाजीत वारकरी व नागरिकांनी वारीचे जल्लोषात स्वागत केले. विठ्ठल-रुक्मिणीच्या जयघोषात भाविकांनी पवित्र विठ्ठल पादुकांची आरती करून मनोभावे दर्शन घेतले. संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता.

ही वैश्विक वारी यूके, नेदरलँड्स, जर्मनी, फ्रान्स, स्वित्झर्लंड, इटली, तुर्की, दुबई, ओमान, सिंगापूर आदी देशांचा प्रवास करत भारतात दाखल झाली आहे. जगभर वारकरी परंपरा, संत संस्कृती आणि श्री विठ्ठल भक्तीचा संदेश पोहचवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याची माहिती आयोजक डॉ. अनिल खेडकर यांनी दिली. या स्वागत सोहळ्यास कळंबोली आणि कामोठे परिसरातील राजकीय, सामाजिक, वारकरी, महिला, युवक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

## मतदार यादी पुनरीक्षणासाठी उद्या पनवेलमध्ये विशेष शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादीचे विशेष सखोल पुनरीक्षण २०२६ कार्यक्रमांतर्गत पनवेल विधानसभा मतदारसंघातील ५७४ मतदान केंद्रांवर रविवारी (दि. ५) सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात बूथ लेव्हल ऑफिसर उपस्थित राहून गणना अर्जांचे वाटप व संकलन करणार आहेत.

पनवेल विधानसभा मतदारसंघातील एकही पात्र मतदार मतदार यादीतून वगळला जाऊ नये यासाठी मतदारांनी सहकार्य करण्याचे आवाहन प्रशासनाने केले. मतदारांनी नेहमीच्या मतदान केंद्रावर जाऊन गणना अर्ज भरावा. याबरोबरच ३० जून ते २९ जुलै या कालावधीत पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रत्येक घराला बूथ लेव्हल अधिकारी भेट देत आहेत. या उपक्रमास नागरिकांनी सक्रिय प्रतिसाद देऊन बीएलओंना आवश्यक सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# विंधणेतील शाळेत बीज अंकुरणाचे धडे

**उरण : वार्ताहर**

महाराष्ट्र कृषिदिनाच्या निमित्ताने बी. एस. पाटील इंग्लिश मीडियम स्कूल, विंधणे येथे हरित दिन व बीज अंकुरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धन, वृक्षांचे महत्त्व आणि शेतीविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी विद्यार्थ्यांनी बीज अंकुरण प्रक्रियेचे प्रात्यक्षिक, वृक्षसंवर्धनाचे महत्त्व आणि पर्यावरण संरक्षणाशी संबंधित विविध उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना वृक्षांचे महत्त्व, निसर्गाशी असलेले आपले नाते आणि पर्यावरण संतुलन राखण्यासाठी प्रत्येकाने योगदान देण्याची गरज याविषयी मार्गदर्शन मिळाले.

शाळेचे संस्थापक अध्यक्ष कैलास बी. पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वृक्ष लागवड, वृक्षसंवर्धन आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अवलंब करण्याचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी विद्यार्थ्यांना निसर्गप्रेमी आणि जबाबदार नागरिक बनण्याचे आवाहन केले आहे.





**पनवेल** : भाजप कामगार आघाडीच्या सहसचिवपदी बाळाराम पाटील, तर प्रसिद्धिप्रमुखपदी राजपाल शेगोकार यांची नियुक्ती करण्यात आली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना शुक्रवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते नियुक्तीपत्र सुपूर्द करण्यात आले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दोन्ही पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा देत कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी व संघटनेची ताकद वाढवण्यासाठी जोमाने काम करावे, अशा शब्दांत शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजप कामगार आघाडीचे जिल्हाध्यक्ष रवी नाईक, सचिव रवींद्र कोरडे, सहखजिनदार उपेंद्र मराठे, माजी पंचायत समिती सदस्य आनंद भोईर आदी उपस्थित होते.

# पनवेलमध्ये अवयवदान जनजागृतीसाठी दिंडीचे प्रस्थान

## महापौरांसह मान्यवरांचा सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आषाढी वारी पालखी सोहळा २०२६ निमित्त पनवेल महानगरपालिका आणि धन्वंतरीज ऑर्गनायझेशन फॉर सोशियो-हेल्थ ट्रान्सफॉर्मेशन (दोस्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अवयवदान व आरोग्य सेवा दिंडीचा प्रस्थान सोहळा व दोस्त दिंडी पुरस्कार सोहळा गुरुवारी (दि. २) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे उत्साहात संपन्न झाला.



या सोहळ्यावेळी पनवेल महानगरपालिका महापौर नितीन पाटील, मानव ज्योत चॅरिटेबल ट्रस्ट मुंबईचे अध्यक्ष के. सी. लुथिया, महाराष्ट्र शासन आरोग्य सेवा विभागाचे माजी महासंचालक डॉ. सुभाष साळुंखे, मसिना रुग्णालय विश्वस्त व्हॅस्कुलर सर्जन डॉ. गुस्ताद डावर, वैष्णव चॅरिटेबल ट्रस्ट कुर्लाचे अध्यक्ष विजय कासुर्डे यांचा दिंडी पुरस्काराने सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पनवेल महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे होते. उपमहापौर प्रमिला पाटील, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महापालिका सदस्य अजय बहिरा, सुमित झुंजारराव यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मध्य रेल्वेचे मुख्य प्रवासी परिवहन व्यवस्थापक (IRTS) डॉ. मिलिंद हिरवे, संत तुकाराम महाराज संस्थान, देहूचे माजी अध्यक्ष ह.भ.प. रामदास महाराज मोरे मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

दोस्त मुंबई उपक्रमाचे प्रमुख ट्रान्सप्लांट सर्जन डॉ. कैलास जवादे, सचिव डॉ. गोविंद जवादे, अध्यक्ष वैशाली बंडे, प्रमोद चुंचूवार व प्रमुख सल्लागार डॉ. वत्सला त्रिवेदी यांच्या सोबत दोस्त टीमने या कार्यक्रमासाठी विशेष मेहनत घेतली.पनवेल महानगरपालिका वैद्यकीय विभागाकडून मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, वैद्यकीय अधिकारी डॉ. भक्तराज भोईटे, डॉ. सुरेश पंडित, कुष्ठरोग अधिकारी डॉ. उषा राठोड उपस्थित होते. या सोहळ्याच्या निमित्ताने दोस्त कला मंच व नृत्य नवरसा अकॅडमी यांच्या वतीने 'हेचि दान देगा' हा भक्तिमय सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमाची सुरुवात वृक्ष पूजन व महाराष्ट्र गीताने झाली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी अवयवदानावर आधारित लघु नाट्याचे सादरीकरण केले. अवयवदान चळवळीस बळकटी देणाऱ्या विविध संस्था व व्यक्तींचाही सत्कार या कार्यक्रमात करण्यात आला.

अवयवदान संकल्प कार्ड व अवयवदान माहितीपत्रकाचे अनावरण करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अवयवदानाचे महत्त्व, समाजामध्ये आरोग्याविषयी जनजागृती करण्याची गरज तसेच सामाजिक बांधिलकी जोपासण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. अधिकाधिक नागरिकांनी अवयवदानाचा संकल्प करून समाजहितासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही मान्यवरांनी केले.ह.भ.प. रामदास महाराज मोरे यांनी यावेळी वारीची संकल्पना अनादी असून भारतीय संस्कृतीला व वारीला दानाची मोठी परंपरा असल्याचे सांगितले. एका व्यक्तीच्या देहदानाने अनेकांच्या जीवाचे संरक्षण होत असल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. यानंतर अवयवदान व आरोग्य जनजागृतीचा संदेश देणाऱ्या आरोग्य सेवा दिंडीला महापौरांच्या हस्ते भगवा झेंडा दाखवून उत्साहात प्रस्थान देण्यात आले. उपस्थितांनी दिंडीला शुभेच्छा देत उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

### महापौर नितीन पाटील यांचा देहदानाचा संकल्प

अवयवदान व आरोग्य दिंडी प्रस्थान आणि दिंडी पुरस्कार वितरण सोहळ्याला उपस्थित झाल्यानंतर महापौर नितीन पाटील यांनी स्वतःच्या देहदानाचा फॉर्म भरून देहदानाचा संकल्प केला. दिंडी पुरस्कार स्वीकारल्यानंतर महापौरांनी मनोगत व्यक्त करताना अवयवदानाबाबत अंधश्रद्धा व अज्ञान दूर करणे आवश्यक असून ही जगण्याला बळ देणारी कृती असल्याचे नमूद केले. यावेळी सर्व उपस्थितांना देहदानाचा संकल्प करण्याचे आवाहन महापौरांनी केले.



**पनवेल** : आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर दरवर्षीप्रमाणे यंदाही कोकण पायी दिंडीची पंढरपूरकडे कूच झाली. पनवेल येथील ऐतिहासिक व जागृत देवस्थान असलेल्या श्री बल्लाळेश्वर मंदिरातून या दिंडीचे विठूनामाच्या जयघोषात आणि टाळ-मृदंगाच्या गजरात उत्साहात प्रस्थान झाले. नगरसेविका दर्शना भोईर, रमेश चिखलेकर, शांताराम पाटील, गुरूनाथ घरत, शंकर म्हात्रे, सपना पाटील, कविता पाटील आणि संजय साखरे यांच्यासह अनेक भाविकांनी या सोहळ्याला उपस्थित राहून विठ्ठल-रखुमाईच्या चरणी माथा टेकवला.

## संपादकीय

# समतोल राखण्याचा प्रयत्न

अनेक वर्षांपासून हजारो कारागीर आणि त्यांचे कुटुंबीय पीओपी मूर्तींवर अवलंबून आहेत. असे असताना अचानक कठोर निर्बंध लादल्यास कारागिरांसमोर गंभीर आर्थिक संकट उभे राहू शकते. त्यामुळेच पीओपीच्या प्रश्नाकडे केवळ ‘बंदी’ किंवा ‘परवानगी’ अशा दोन टोकाच्या दृष्टीने पाहणे खरेच योग्य आहे का याचा विचार झाला पाहिजे. राज्य सरकारने ही सामाजिक बाब लक्षात घेतली असून पर्यावरणपूरक पर्याय उपलब्ध करताना संक्रमणाचा कालावधी आवश्यक असल्याची सरकारची भूमिका आहे.

**गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचा अविभाज्य भाग आहे. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाने समाजजागृती, राष्ट्रभक्ती आणि सामाजिक एकात्मतेला नवी दिशा दिली. त्यामुळे प्लास्टर ऑफ पॅरिस अर्थात पीओपी मूर्तींच्या विसर्जनासंदर्भात निर्माण झालेला वाद हा केवळ पर्यावरणाचा विषय नसून श्रद्धा, परंपरा आणि रोजगारासंदर्भातीलही विषय आहे. अशा परिस्थितीत महाराष्ट्र सरकारने घेतलेली संतुलित भूमिका ही दूरदृष्टीची आणि व्यावहारिक म्हणावी लागेल. पर्यावरणाचे संरक्षण करणे ही सरकारची जबाबदारी आहेच. त्याचवेळी लाखो गणेशभक्तांच्या धार्मिक भावना आणि हजारो मूर्तिकारांच्या उपजीविकेचाही विचार सरकारने करणे तितकेच आवश्यक आहे. म्हणूनच राज्य सरकारने बुधवारी मुंबई उच्च न्यायालयासमोर अशी भूमिका मांडली आहे की, गेल्या वर्षीप्रमाणेच यंदाही मूर्तींच्या विसर्जनास परवानगी देण्यात यावी. पीओपीच्या मोठ्या म्हणजे सहा फुटांवरील मूर्तींच्या विसर्जनासाठी नैसर्गिक जलस्त्रोतांमध्ये नियंत्रित व्यवस्था, तर त्याहून कमी उंचीच्या लहान मूर्तींसाठी कृत्रिम तलावांचा वापर अशा उपायांद्वारे पर्यावरण आणि परंपरा यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न सरकार करत आहे. मात्र या पद्धतीला आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या बदललेल्या भूमिकेला जनहित याचिकाकर्त्यांनी आव्हान दिले आहे. त्याविषयी दोन आठवड्यांत उत्तर देण्यास राज्य सरकारसह अन्य प्रतिवादींना सांगून न्यायालयाने अंतरिम आदेश देण्याऐवजी अंतिम निर्णयच देण्याचे संकेत दिले आहेत. न्यायालयाच्या निर्देशांप्रमाणे राज्य सरकारने वैज्ञानिक तज्ज्ञ समिती नेमली होती. या समितीच्या शिफारशीही सरकारने न्यायालयात सादर केल्या आहेत. पीओपी मूर्तींची वैज्ञानिक पद्धतीने पुनर्प्रक्रिया, स्वतंत्र कृत्रिम विसर्जन तलाव, तसेच पुनर्वापराच्या तंत्रज्ञानाचा अभ्यास अशा उपायांवर सरकार काम करत आहे. काही रासायनिक प्रक्रिया तांत्रिकदृष्ट्या आणि आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य आहेत का याचाही अभ्यास सुरू आहे. यावरून सरकार हा प्रश्न भावनेने नव्हे तर विज्ञानाच्या आधारावर सोडवण्याचा प्रयत्न करत असल्याचे स्पष्ट होते. मुंबई, नवी मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर अशा आठ ते दहा शहरांत विसर्जनानंतर साठवून ठेवलेल्या पीओपी मूर्तींवर पुनर्प्रक्रिया करण्याचा पथदर्शी प्रकल्प राबवण्यात येणार आहे. त्याच्या यशस्वितेनंतर सुयोग्य पर्याय अंतिम केला जाईल. पर्यावरण संरक्षण हे नक्कीच महत्त्वाचे आहे. मात्र श्रद्धेचा अवमान करून किंवा लाखो नागरिकांना अडचणीत आणून ते साध्य होणार नाही. जनजागृती, पर्यावरणपूरक रंगांचा वापर, कृत्रिम विसर्जन तलावांची संख्या वाढविणे, विसर्जनानंतर तातडीने स्वच्छता आणि पीओपी कचऱ्याचे वैज्ञानिक व्यवस्थापन यांसारख्या उपाययोजनांमुळे अधिक चांगले परिणाम मिळू शकतात. राज्य सरकारने पर्यावरण आणि परंपरा यांच्यात समतोल साधण्याचा जो प्रयत्न सुरू केला आहे, त्याला समाजातील सर्व घटकांनी सकारात्मक सहकार्य करण्याची गरज आहे. कुणाच्याही श्रद्धेला धक्का न पोहोचवता पर्यावरणाचेही रक्षण करण्याचा हाच मार्ग महाराष्ट्राच्या संस्कृतीला अधिक शोभणारा आहे.**

# बळीराजाच्या स्वाभिमानाला नवे बळ!

महाराष्ट्र ही संतांची, पुरोगामी विचारांची आणि अहोरात्र कष्ट करणाऱ्या बळीराजाची भूमी आहे. राज्याची अर्थव्यवस्था, ग्रामीण विकास आणि सामाजिक जीवनाची वीण ही शेती व शेतकऱ्यांच्या अथक परिश्रमांवर उभी आहे. निसर्गाची अनिश्चितता, अवकाळी पाऊस, दुष्काळ, बाजारभावातील चढ-उतार आणि वाढता उत्पादन खर्च अशा असंख्य संकटांचा सामना करत अन्नदाता आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक राहतो. अशा या शेतकऱ्याला केवळ सहानुभूतीची नव्हे, तर आर्थिक स्थैर्य, विश्वास आणि शासनाच्या भक्कम पाठबळाची आवश्यकता असते.



याच भावनेतून महाराष्ट्र शासनाने ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६’ जाहीर केली आहे. ही योजना केवळ कर्जमाफीची घोषणा नसून, शेतकऱ्यांच्या स्वाभिमानाला बळ देणारे, ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी गती देणारे आणि शेती क्षेत्रात नवचैतन्य निर्माण करणारे एक ऐतिहासिक पाऊल आहे.

महाराष्ट्रात दरवर्षी १ जुलै हा दिवस ‘कृषी दिन’ म्हणून साजरा केला जातो. हा दिवस महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि हरित क्रांतीचे प्रणेते स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो. आधुनिक शेती, सिंचन, पीकपद्धतीतील बदल आणि कृषी विकासाच्या दूरदृष्टीपूर्ण धोरणांमुळे त्यांनी महाराष्ट्राला अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबनाच्या दिशेने नेले. ‘शेतकरी समृद्ध झाला तरच राज्य समृद्ध होईल,’ हा त्यांचा दूरदर्शी विचार आजही तितकाच प्रेरणादायी आहे.

स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या याच विचारांचा वारसा पुढे नेत महाराष्ट्र शासनाने जून २०२६ मध्ये राज्यातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत थकबाकीदार शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतच्या पीककर्जाची माफी जाहीर करण्यात आली आहे. त्याचबरोबर, प्रतिकूल परिस्थितीतही प्रामाणिकपणे कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या शिस्तीचा आणि प्रामाणिकपणाचा सन्मान करत त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा निर्णयही शासनाने घेतला आहे. त्यामुळे ही योजना केवळ कर्जमाफीपुरती मर्यादित न राहता, आर्थिक शिस्तीलाही प्रोत्साहन देणारी ठरते.

राज्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी शासन कटिबद्ध आहे. राज्य शासनाने शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेअंतर्गत ५६ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना सुमारे ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ देण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विविध कर्जमाफी योजना राबविल्या आहेत. दुष्काळ, अतिवृष्टी आणि इतर संकटांमुळे प्रभावित झालेल्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी राज्य शासनाने विविध कालखंडात कर्जमुक्तीचे निर्णय घेतले. या योजनांमुळे लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून त्यांना पुन्हा शेती व्यवसाय उभा करण्याची संधी मिळाली.

याशिवाय, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक कर्ज असलेल्या आणि ज्यांची खाती बँकांकडे अनुत्पादित मालमत्ता (एनपीए) म्हणून वर्गीकृत झाली आहेत, अशा शेतकऱ्यांसाठीही शासनाने दिलासादायक भूमिका घेतली आहे. बँकांसोबत ‘एकवेळ समझोता’ (One Time Settlement OTS) करण्याच्या माध्यमातून या शेतकऱ्यांना नव्याने आर्थिक प्रवाहात सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या योजनेत करण्यात आला आहे. त्यामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना नव्याने उभारी मिळण्याचा मार्ग खुला होणार आहे.

कोणतीही योजना केवळ घोषणांपुरती मर्यादित न राहता तिचा लाभ शेवटच्या लाभार्थ्यापर्यंत पारदर्शक, वेगवान आणि प्रभावीपणे पोहोचला पाहिजे, या भूमिकेतून शासनाने अंमलबजावणीची मजबूत यंत्रणा उभारली आहे. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी थेट मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली आहे. जिल्हानिहाय आवश्यक निधीची तातडीने उपलब्धता करून देण्यात आली असून, महाआयटीच्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रिया डिजिटल, पारदर्शक आणि वेळबद्ध करण्यात आली आहे. शासनाच्या कार्यपद्धतीतील ही गतिमानता आणि उत्तरदायित्व या योजनेच्या यशाला अधिक बळकटी देणारे ठरणार आहे.

ही कर्जमुक्ती योजना म्हणजे केवळ आर्थिक मदतीचा कार्यक्रम नाही; तर बळीराजाच्या आत्मविश्वासाला नवसंजीवनी देणारा, त्याच्या स्वाभिमानाचा सन्मान करणारा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नव्या उमेदीने पुढे नेणारा परिवर्तनाचा संकल्प आहे. कृषी दिनाच्या पावन निमित्ताने शेतकऱ्यांच्या हितासाठी उचललेले हे ऐतिहासिक पाऊल महत्वाचे ठरणार आहे. या योजनेच्या बळावर महाराष्ट्रातील बळीराजा नव्या आत्मविश्वासाने उभारी घेईल, शेती अधिक सक्षम बनेल आणि ग्रामीण समृद्धीचा नवा अध्याय लिहिला जाईल.

**–वर्षा फडके आंधळे, उपसंचालक (वृत्त), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

# प्रसिद्ध कादंबरीकार र. वा. दिघे

मराठी कादंबरीकार रघुनाथ वामन दिघे यांचा आज स्मृतिदिन. त्यांचा जन्म कल्याण येथे झाला. त्यांच्या वडिलांची नोकरी बदलीची असल्यामुळे दिघे यांचे शालेय शिक्षण कर्जत, खोपोली, जळगाव, चाळीसगाव, सोलापूर, रत्नागिरी अशा विविध ठिकाणी झाले पुणे येथे राहून त्यांनी बीए, एलएलबीपर्यंतचे महाविद्यालयीन शिक्षण घेतले. त्यानंतर पनवेल येथे अल्पकाळ वकिली केल्यावर १९२७ मध्ये ते पुण्यास आले आणि १९४२पर्यंत मुख्यतः फौजदारी कोर्टात त्यांनी वकिली केली. त्यानंतर मात्र वकिलीचा व्यवसाय सोडून देऊन ते शेती करू लागले. खोपोलीजवळच्या विहारी या गावात तेव्हापासून त्यांचे वास्तव्य होते.



दिघे हे प्रादेशिक कादंबरीकार. ग्रामीण जीवनाच्या प्रत्यक्ष अनुभवातून व निसर्गाच्या रम्य सहवासातून त्यांचे लेखन स्फुरलेले आहे. त्यांनी शिकारीचाही छंद होता. त्यांच्या कादंबऱ्यांत नाट्यपूर्ण, रसरशीत साहसी घटना, अद्‌भुतरम्य वातावरण, काव्यात्म वर्णने, ठसठशीत व्यक्तिदर्शने, ग्रामीण जीवनाचे प्रत्ययपूर्ण चित्रण ह्यांचे प्राचुर्य असते. दिघे यांनी काही कथालेखनही केलेले आहे. माझा सबूद नावाचे नाटकही त्यांनी लिहिले आहे (१९४९). गातात व नाचतात धरतीची लेकरे (१९५०) नावाचा त्यांचा एक लोकगीतसंग्रहही आहे. पण त्यांची मुख्य मदार आहे ती कादंबरीलेखनावर. गानलुब्धा मृगनयना (१९४७) ऐतिहासिक रम्याद्‌भुत कादंबरी सोडल्यास त्यांचे कादंबरीलेखन मुख्यतः ग्रामीण जीवनावर आधारलेले आहे.

दिघे यांची पहिली कादंबरी पाणकळा (१९३९). नगरकडील ग्रामीण जीवनात तीत कहाणी आहे. या कादंबरीच्या आगमनापर्यंत ग्रामीण जीवन कादंबरीविश्वात उपेक्षितच होते विषयाच्या नवाईमुळे आणि शैलीतील काव्यात्मतेमुळे ही कादंबरी बरीच गाजली तिला १९४० साली ना. सी. फडके पारितोषिकही मिळाले. पाणकळाच्या लोकप्रियतेमुळे दिघे यांचा लेखनोत्साह वाढीस लागला. दिघे यांनी आपल्या ग्रामीण कादंबऱ्यांत जो परिसर निवडलेला आहे, तो अंतर्बाह्य ग्रामीण व कृषिव्यवसायात्मक असतो. दिघे स्वतःला अभिमानाने शेतकरी कादंबरीकार म्हणवून घेतात. पुष्कळदा त्यांच्या कादंबऱ्यांत शेतीविषयक प्रश्नांचा व इतर सुधारणांचाही अंतर्भाव होतो. उदा., कोरडवाहू शेती व बांधबंधारे यांचा संबंध त्यांनी पड रे पाण्यात दाखविला आहे कार्तिकीत अस्पृश्यतेच्या विषयाला हात घातलेला आहे, तर आई आहे शेतात मध्ये जमीनदार आणि कूळ यांच्यातील संबंधांना स्पर्श केलेला आहे. ४ जुलै १९८० रोजी त्यांचे निधन झाले.

(साभार इंटरनेट)




# मोबाईल नंबरशिवाय चॅटिंग पडणार महागात

मोबाईल विश्वात क्रांती घडवून आणण्याच्या तयारीत असलेले व्हॉट्सॲपचे बहुप्रतीक्षित ‘युझरनेम’ फीचर भारतात लाँच होण्यापूर्वीच वादात सापडले आहे. युझर्सच्या गोपनीयतेचा हवाला देत कंपनी हे फीचर आणत असली तरी देशाच्या सुरक्षेच्या व सायबर गुन्ह्यांच्या दृष्टीने केंद्र सरकारने यावर आक्षेप घेतला आहे. सरकारने मेटा कंपनीला कारणे दाखवा नोटीस पाठवून उत्तर मागवले आहे. इतकेच नव्हे तर, तोपर्यंत या फीचरच्या भारतातील रोलआउटवर बंदी घालण्यात आली आहे.




सध्या व्हॉट्सॲपवर कोणाशीही संपर्क साधण्यासाठी किंवा मेसेज–कॉल करण्यासाठी मोबाईल नंबरची आवश्यकता असते. हाच नियम बदलण्यासाठी कंपनी ‘युझरनेम’ फीचर आणत आहे. यामध्ये टेलिग्राम ॲपप्रमाणेच, युझर्स मोबाईल नंबरऐवजी फक्त एका युझरनेमच्या मदतीने कोणाशीही कनेक्ट होऊ शकतील. अकाउंट व्हेरिफिकेशनसाठी मोबाईल नंबर लागेल, परंतु चॅटिंग करताना तो कोणालाही दिसणार नाही. हे फीचर युझर्सना त्यांची खरी ओळख लपवण्याची संधी देते, आणि नेमकी हीच बाब सरकारच्या चिंतेचे कारण बनली आहे.

व्हॉट्सॲप जरी याला प्रायव्हसीचे साधन मानत असले, तरी सरकारच्या मते यामुळे गुन्हेगारांचे काम सोपे होणार आहे.

सायबर ठगी आणि डिजिटल अरेस्टचा धोका : युझरनेममुळे व्यक्तीचा मोबाईल नंबर लपला जाईल. याचा गैरफायदा घेऊन ऑनलाईन फ्रॉड, फिशिंग आणि सध्या वेगाने वाढणारे ‘डिजिटल अरेस्ट’ यांसारखे सायबर गुन्हे प्रचंड प्रमाणात वाढू शकतात.

बनावट अकाऊंट्सचा सुळसुळाट : जर एखाद्या व्यक्तीने बँक, सरकारी विभाग किंवा एखाद्या नामांकित व्यक्तीच्या नावाशी मिळतेजुळते युझरनेम तयार केले, तर सर्वसामान्यांची फसवणूक करणे अत्यंत सोपे होईल.

ओळख चोरी : अनेक युझर्सनी आधीच तक्रार केली आहे की, त्यांचे मूळ नाव वापरून इतर लोकांनी आधीच युझरनेम्स रिझर्व्ह करून ठेवले आहेत.

केवळ सरकारच नाही, तर वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनीही या फीचरवर चिंता व्यक्त केली आहे. आयपीएस अधिकारी अरुण बोथरा यांनी सोशल मीडिया मंच ‘एक्स’वर लिहिले की, व्हॉट्सॲपचे युझरनेम–बेस्ड आयडेंटिटी फीचर कायदेशीर तपास यंत्रणांसाठी खूप मोठे आव्हान ठरू शकते. कंपनीचा एक छोटासा बदल सार्वजनिक सुरक्षेवर मोठा आघात करू शकतो.

# गायक-अभिनेते पं. निवृत्तीबुवा सरनाईक

हिंदुस्थानी रागसंगीताच्या क्षेत्रातील जयपूर–अत्रौली गायकीशी संबंधित एक अग्रगण्य गायक म्हणजे पं. निवृत्तीबुवा सरनाईक. त्यांचा जन्म ४ जुलै १९१२ रोजी कोल्हापूर येथे संगीतप्रिय कुटुंबात झाला. त्यांचे वडील तुकारामबुवा सरनाईक (मूळ उपनाम जाधव) हे एक नावाजलेले भजनी गायक होते.



निमित्त

निवृत्तीबुवांना दोन मोठे भाऊ व एक बहीण. निवृत्तीबुवा चार वर्षांचे असतानाच त्यांच्या मातोश्री निवर्तल्या. काही कालावधीनंतर त्यांच्या वडिलांनी दुसरा विवाह केला. कौटुंबिक कारणामुळे वडिलांनी आपल्या तीन अपत्यांस प्रथमपत्नीच्या माहेरी पाठवले. निवृत्तीबुवांना मात्र त्यांची बालवयातच दिसून आलेली गायनाची आवड लक्षात घेऊन त्यांनी त्यांचे सर्वांत कनिष्ठ बंधू शंकरराव सरनाईक यांच्या हवाली केले. ‘महाराष्ट्र कोकिळ’ शंकरराव सरनाईक हे प्रसिद्ध गायक–नट होते. मराठी नाटक व चित्रपटसृष्टीमध्ये आपल्या उत्तम अभिनयाने प्रख्यात झालेले गायक–अभिनेते अरुण सरनाईक यांचे ते वडील होत. तेव्हा शंकरराव हे गोविंदराव टेंबे यांच्या ‘शिवराज संगीत नाटक मंडळी’मध्ये काम करीत असत. त्यांच्यासह निवृत्तीबुवांचे गायन–शिक्षण आणि नाटक मंडळीबरोबरची भ्रमंती चालू झाली. शंकरराव १९१९च्या सुमारास कोल्हापुरास परतले. इंदूर संस्थानचे राजे तुकोजीराव होळकर यांच्या पाठिंब्याने शंकररावांनी सुरू केलेल्या यशवंत संगीत नाटक मंडळीत कृष्णराव गोरे, सवाई गंधर्व, नत्थूखाँ असे अनेक मोठे गवई होते. आपल्या काकांसह या सर्वांच्याच गायनाचे संस्कार निवृत्तीबुवांवर झाले, पण त्यांच्या औपचारिक गायनशिक्षणाची सुरुवात मात्र गोविंदबुवा भावे यांच्यापासून झाली. तबलावादक बळवंत रुकडीकर व बाबालाल इस्लामपूरकर यांच्याकडून तबलावादनचे शिक्षणही त्यांनी घेतले. त्यामुळे त्यांच्या गायनातही लयतालाचे सूक्ष्म अंग दिसू लागले.

निवृत्तीबुवांनी आठ वर्षांचे असताना चलती दुनिया या हिंदी संगीत–नाटकात तोता–मैना या पात्रांपैकी ‘तोता’ हे पात्र साकारले. पुढे १४ वर्षांचे झाल्यावर नायिकेच्या भूमिकाही त्यांनी केल्या. काही काळ संगीत नाटकांत स्त्री–भूमिका करून त्यांनी नाव मिळवले. त्यांची सत्याग्रही या नाटकातील नारदाची भूमिका खूप गाजली. या काळात त्यांना सवाई गंधर्व यांच्याकडून किराणा घराण्याच्या स्वरमाधुर्यप्रधान गायकीची तालीम मिळाली. काका शंकरराव यांना ख्यालगायकी शिकण्याचा खूपच नाद होता, मात्र नाटक मंडळीच्या व्यापातून तालीम घ्यायला त्यांना वेळ होत नसे. अशा वेळी उस्तादांनी आपला पुतण्या निवृत्तीस शिकवावे, असे ते सांगत. त्यामुळे निवृत्तीबुवांना उस्ताद रजब अलीखाँ आणि उस्ताद अल्लादियाखाँ या दोघांचीही तालीम मिळाली. त्यांच्या गायनात किराणा व जयपूर–अत्रौली या दोन्ही गायकींचा सुरेख मिलाप झालेला दिसतो.

१९६६ साली निवृत्तीबुवा कोल्हापूरहून मुंबईस स्थायिक झाले. १९६९ ते १९७९ या कालावधीत मुंबई विद्यापीठाच्या संगीत विभागात गायनगुरू म्हणून त्यांनी काम केले. १९७९पासून पुढे काही काळ कोलकाता येथील आयटीसी संगीत रिसर्च अकादमीमध्ये ते गायनगुरू होते. कंपवाताच्या विकाराने ग्रासल्याने ते मुंबईस परतले. १६ फेब्रुवारी १९९४ रोजी त्यांचे निधन झाले.

**–मनीषा पोळ (मराठी विश्वकोष)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# तेलकट, तुपकट, मैद्याचे पदार्थ न खाताही कोलेस्टेरॉल का वाढते?

हल्ली बदललेल्या जीवनशैलीमुळे कमी वयातच कित्येक आजार मागे लागत आहेत. वजनवाढीची समस्या तर आहेच, पण त्यासोबतच इतरही काही आजार आपोआप जोडले जातात. त्यापैकीच एक आहे कोलेस्टेरॉल वाढणे. शरीरातलं बॅड कोलेस्टेरॉल वाढण्याची तक्रार तर हल्ली तिशीतच कित्येक लोक करू लागले आहेत. बॅड कोलेस्टेरॉल वाढलं की त्याचा परिणाम आपोआप हृदयावर होतो. म्हणून बरेच जण स्वतःची काळजी घेतात आणि बाहेरचे पदार्थ खाणे, तसेच तेलकट, तुपकट, मैद्याचे पदार्थ खाणेही टाळतात, पण तरीही त्यांची कोलेस्टेरॉलची पातळी कमी होत नाही. असं का होतं ते पाहा...



✻ काही एक्सपर्ट असं सांगतात की तुम्हाला बॅड कोलेस्टेरॉलचा त्रास असणं हे बऱ्याचदा तुमच्या अनुवंशिकतेवरही अवलंबून असतं. काही आजार अनुवंशिक असतात तसेच कोलेस्टेरॉलचा त्रासही बऱ्याच प्रमाणात अनुवंशिक आहे. त्यामुळे तुमच्या कुटूंबात जर ही हिस्ट्री असेल तर वेळोवेळी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा आणि त्यानुसार औषधं घ्यावी.

✻ काही लोक खूप पौष्टिक खातात, पण तरीही त्यांचं कोलेस्टेरॉल वाढलेलं असतं. याचं कारण म्हणजे ते व्यायाम करत नाहीत. जर व्यायाम केला नाही तर कॅलरी बर्न होत नाहीत. शरीरात फॅट्स साचून राहतात. आणि बॅड कोलेस्टेरॉल वाढत जातं. त्यामुळे योग्य आहार घेत असाल तरीही व्यायाम करणंही तेवढंच गरजेचं आहे.

✻ काही लोकांना खूप जास्त ताण असतो. ऑफिसमध्ये कामाचा ताण वाढलेला असतो. किंवा इतरही काही टेन्शन्स असतात. या ताणाचा शरीरावर परिणाम होत जातो. कॉर्टिसोल हार्मोन वाढतो, तसेच झोपही कमी होते. खूप ताण आणि अपुरी झोप हे जर सतत होत राहिले तर त्यामुळेही बॅड कोलेस्टेरॉल वाढते.

✻ हल्ली बाजारात हेल्दी फूडच्या नावाखाली जे पॅकबंद फूड मिळते त्यात कित्येक प्रिझर्व्हेटिव्ह, केमिकल्स आणि शुगर असते. त्यामुळे ट्रायग्लिसराईड वाढते आणि त्यामुळे आपोआप बॅड कोलेस्टेरॉल वाढत जाते.

दर दोन वर्षांनी एकदा कोलेस्ट्रॉल तपासणी करून घेणं ही एक चांगली सवय आहे, ज्यामुळे तुम्हाला शरीरातील कोलेस्ट्रॉलची पातळी वेळोवेळी समजत राहते.

# वरेडे कोळीवाड्यातील नागरी प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध -वैकुंठ पाटील





**पेण : प्रतिनिधी**

ज्या गावाने मला ताकद दिली आहे त्या गावाला ताकद देण्याचे निश्चितपणे काम मी करणार असून वरेडी कोळीवाड्यातील माझ्या महिला भगिनींचे प्रश्न सोडवण्यासाठी मी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन कृषी व पशुसंवर्धन तसेच दुग्धविकास समिती सभापती वैकुंठ पाटील यांनी वरेडी येथील कार्यक्रमाप्रसंगी बोलताना केले. वरेडी कोळीवाडा येथे स्वखर्चाने विक्रम मिनिडोर रिक्षा स्टॅण्ड बांधणे, गणपती मंदिर ते खिरकोली देवी रस्ता, अतंर्गत रस्ता, खिरकोळी देवी शेड, पाईप लाईन व व्यायामशाळेचे नूतनीकरण अशा विविध विकास कामाचे उद्‌घाटन रायगड जिल्हा परिषदेचे सभापती वैकुंठ पाटील यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. यावेळी कृषी व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील म्हणाले की, निवडणुकी पुरते नाही तर जनसामान्याच्या सोबत राहण्यासाठी विकासकामे होत आहेत. सरकारच्या योजना तळागाळातील जनतेपर्यंत पोचवण्याचे काम करण्यात येणार असून संजय गांधी योजनेचा लाभ मिळवून देणार असल्याचे सांगितले. तसेच सभागृहासाठी १० लाखांचा भरीव निधी आणून भव्य सभागृह करण्यात येईल असा विश्वास दिला.

यावेळी कृषी व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील यांच्या समवेत प्रशासक गणेश भंडारकर, ग्रामसेवक शितल पाटील, नरेंद्र कोळी (महाराज), नरेश कोळी, जे.डी.कोळी, नितीन मोकल, राजाराम कोळी आदींसह ग्रामस्थ आणि महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एनडीआरएफचे पथक महाडमध्ये

**महाड : रामप्रहर वृत्त**

संभाव्य नैसर्गिक आपत्ती आणि महापुराचा धोका लक्षात घेऊन राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (एनडीआरएफ) ३२ जवानांचे पथक महाडमध्ये दाखल झाले आहे. पावसाळ्यात आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी प्रशासनाने ही पूर्वतयारी केली असून महाडमध्ये पथकाचा तळ उभारण्यात आला आहे.

मागील काही वर्षांतील पूर व दरडींच्या घटनांचा अनुभव घेऊन यंदाही पावसाळ्यात एनडीआरएफचे पथक महाडमध्ये तैनात करण्यात आले आहे. मेच्या अखेरीस महाडमध्ये दाखल होणारे पथक यंदा एल-निनोच्या प्रभावामुळे मान्सून उशिरा सक्रिय झाल्याने जुलैच्या सुरुवातीला महाडमध्ये पोहचले. नगर परिषदेच्या दस्तुती नाका येथील रमा विहार येथे या पथकाचा तळ उभारण्यात आला आहे.


### पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

**जाहीर सूचना**
**विद्युत विभाग**

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने विद्युत विभागातील पनवेल महानगरपालिका मालकीच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह पनवेल येथील जुने उद्‌वाहक बदलून नवीन उद्‌वाहक स्थापित करणे कामाचे अंदाजपत्रक बनवण्याकरीता संबंधित Manufacturer/Dealer/Contractor कडून वेगवेगळ्या बाबींचे दर मागविण्यात येत आहे. सदरची माहिती या वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जा.क्र.पमपा/जनसंपर्क./३१२६/
प्र.क्र.१९०/२०२/२०२६

सही/-
किरण जाधव
विद्युत विभाग प्रमुख
पनवेल महानगरपालिका



### पाहिजेत

( तुमचा अनुभवांचे उत्पनात रुपांतर करा)

सेवानिवृत्त, जेष्ठ, नागरिक, गृहिणी, शिक्षक, बँक कर्मचारी, माजी सैनिक, संस्थापक, स्वयंसेवी संस्था सामाजिक कार्यकर्ते, व्यवसाईकाना मर्यादित संधी

(पूर्णवेळ किंवा अर्धवेळ सोयीनुसार काम करा)

संपर्क क्रमांक :- ९९६७५१४८६१, ९९८७३६६८४१

सही/-
श्रीमती. वैशाली रामकृष्ण ठाकूर.


## मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल भूमिपूजन, जलतरण तलाव लोकार्पण सोहळा

**माणगाव : प्रतिनिधी**

एखाद्या व्यक्तीचा वाढदिवस हा केवळ शुभेच्छा, सत्कार आणि आनंद साजरा करण्याचा दिवस नसतो, तर समाजाच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवून आणणाऱ्या कार्याची नवी सुरुवात करण्याची संधीही असते. समाजहिताला सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांच्या वाढदिवसानिमित्त माणगावच्या विकासाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद होईल असा भव्य आणि लोकोपयोगी दुहेरी सोहळा मंगळवार ७ जुलै रोजी पार पडणार आहे.

या दिवशी सह्याद्री मेडिकल सायन्स अँड रिसर्च फाउंडेशन, रायगड यांच्या माध्यमातून उभारण्यात येणाऱ्या माणगाव मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलचे भूमीपूजन, तसेच बी.टी. स्पोर्ट्स अकॅडमी आणि गेल इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक जलतरण तलावाचे उद्‌घाटन होणार असून, या दोन्ही प्रकल्पांमुळे माणगावच्या आरोग्य आणि क्रीडा क्षेत्राला विकासाची नवी उभारी मिळणार आहे. आजवर गंभीर आजारांवरील उपचारांसाठी मुंबई, पुणे किंवा इतर मोठ्या शहरांकडे धाव घ्यावी लागत होती. वेळ, पैसा आणि मानसिक त्रास सहन करत अनेक कुटुंबांना संकटांचा सामना करावा लागत होता. मात्र आता माणगावातच अत्याधुनिक सुविधा असलेले मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल उभारले जाणार असल्याने हजारो रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी हा प्रकल्प आशेचा किरण ठरणार आहे. ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार व तज्ज्ञ वैद्यकीय सेवा त्यांच्या दारात उपलब्ध होणार असल्याने हा प्रकल्प माणगावच्या विकासातील ऐतिहासिक टप्पा मानला जातो.

जलतरणच्या उद्‌घाटनामुळे विद्यार्थी, युवक-युवती, उदयोन्मुख खेळाडूंना आधुनिक सुविधा उपलब्ध होतील. ग्रामीण गुणवंत खेळाडूंना गावातच जलतरणाचे प्रशिक्षण घेऊन राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर झेप घेण्याची संधी मिळणार आहे.

## जिल्हा वार्षिक योजनेतून मुरूड जंजिरा नगर परिषदेला दोन अत्याधुनिक अग्निशमन वाहने प्राप्त

**मुरूड : प्रतिनिधी**

सर्वसाधारण वार्षिक जिल्हा योजना २०२५-२०२६ अंतर्गत अग्निशमन सेवा व आणीबाणी सेवांचे बळकटीकरण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागामार्फत विशेष बाब म्हणून मुरुड-जंजिरा नगर परिषदेला ५००० लिटर क्षमतेचे एक तसेच २००० लिटर क्षमतेचे एक अशी दोन अत्याधुनिक अग्निशमन वाहने प्राप्त झाली आहेत.



या वाहनांचे लोकार्पण नगराध्यक्षा आराधना दांडेकर, उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत आणि मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांच्या शुभ हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. यावेळी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा आराधना दांडेकर, उपनगराध्यक्ष - वीरेंद्र भगत, मुख्याधिकारी सचिन बच्छाव, पाणी पुरवठा सभापती पांडुरंग आरेकर, नगरसेवक -मनिष विरुकुड, नगरसेवक-श्रीकांत खोत, नगरसेवक विजय पाटील, नगरसेवक मनोज भगत, नगरसेवक आदेश दांडेकर, नगरसेविका -अंकीता - गुरव, नगरसेविका -प्राजंली मकु, नगरसेविका प्रमिला माळी, नगरसेविका देवायानी गुरव, नगरसेविका श्रध्दा अपराध, आरोग्य निरीक्षक-राकेश पाटील, प्रज्वल गुरव आदिंसह मान्यवर उपस्थित होते.

नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की या वाहनांमुळे मुरुड शहरासह परिसरातील आग, नैसर्गिक आपत्ती व इतर आणीबाणीच्या प्रसंगी तात्काळ व प्रभावी प्रतिसाद देणे अधिक सक्षमपणे शक्य होणार आहे.

उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की मुरुड-जंजिरा नगर परिषद नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत असून आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दिशेने सातत्याने प्रयत्नशील आहे. नव्याने प्राप्त या दोन अत्याधुनिक अग्निशमन वाहनांमुळे शहरातील अग्निशमन व आपत्ती व्यवस्थापन सेवा अधिक गतिमान, सक्षम व परिणामकारक होणार असून नागरिकांना अधिक सुरक्षित आणि तत्पर आपत्कालीन सेवा उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार आहे.


### महावितरण — ई-निविदा सूचना

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणा-या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी-३८(4th call), टी-३९(2nd call), टी-४०(2nd call), टी-४१(2nd call), आणि टी-४२ (२०२६-२७) अशा एकुण **पाच** निवीदा महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या e-Tender च्या संकेतस्थाळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निवीदा विक्रीसाठी **दि. ०४.०७.२०२६ पासून ते दि. १३.०७.२०२६ @१३.००** वाजेपर्यंत उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीख **दि. १३.०७.२०२६** ला **१५.००** वाजेपर्यंत आहे. निवीदेच्या आवृत्तीत/तारखा/ इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईवर प्रकाशित केले जाईल.

(सही)
**कार्यकारी अभियंता (स्था.) स्थापत्य विभाग भांडुप**



### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्‌वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **घनश्यामदास उमरावलाल गुप्ता, प्रेम प्रभाकर महाजन, शमा प्रभाकर महाजन, स्तुथी प्रभाकर महाजन, आशा राजेंद्रकुमार जैन, पार्थ राजेंद्रकुमार जैन व पुरु राजेंद्रकुमार जैन** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

मिळकतीचे वर्णन-: **विंधणे (५५३३२४)**
**(PU-ID: ३९०९१२८५४९४), तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट क्रमांक | भुधारणा पद्धत | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १६८/२ | १ | १.५३.०० पो.ख. ०.००.०० | १०.०७ |
| | | एकूण – **१–५३–००** | |

एकूण विक्रीस असलेले खालील क्षेत्र

| | | |
|---|---|---|
| खाते क. ९४९ | ०.५७.५० | ३.७८ |
| | पो.ख. ०.००.०० | |
| | एकुण ०.५७.५० | |

**एकुण क्षेत्र ०.५७.५० गुंठयाचे खरेदीखत**

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठे करार, मिळकत विकसित करणे बाबतचा करार, कुळ हक्क, वारसाहक्क वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१४ दिवसांच्या** आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदपत्री पुराव्यास आपली लेखी हरकत व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क व हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेला कोणत्या हरकती व आक्षेप आमच्या आशीलांवर बंधनकारक राहणार नाही त्याची नोंद घ्यावी.

दिनांक – ०३/०७/२०२६

सही/-
**ॲड. निलेश बाळासाहेब झंजाड**

बी-१०४ सफायर सी.एच.एस.ली. भूखंड क्रमांक ३३/३४
सेक्टर २२ कामोठे ता. पनवेल जि. रायगड – ४१०२०९
मो.क्र- : ९९२०४ ७५८०१


## गणेशभक्त बल्लाळेश्वरचरणी लीन ; संकष्ट चतुर्थीला भरपावसातही हजेरी

**पाली : प्रतिनिधी**

संकष्ट चतुर्थीला अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीत शुक्रवारी (दि. ३) हजारो भाविक श्री. बल्लाळेश्वराच्या चरणी लीन झाल्याचे पहावयास मिळाले. यावेळी रायगड कोकणासह राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक दाखल झाले होते. अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीत संकष्टी चतुर्थीला भरपावसात ही भाविकांची बल्लाळ नगरींत रेलचेल दिसून आली, विशेष म्हणजे पावसात पदयात्रा देखील पहावयास मिळाल्या.



श्री. बल्लाळेश्वर मंदिर व गाभाऱ्यात फुलांची सजावट करण्यात आली होती. श्री. बल्लाळेश्वरला देखील आभूषण व वस्त्र परिधान करण्यात आले होते. श्री. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी जिल्ह्यासह विविध भागातून भाविक दाखल झाले होते. यामुळे येथे चांगली आर्थिक उलाढाल झाली असून येथील स्थानिक व्यावसायिक सुखावले आहेत.



भाविकांमुळे येथील हॉटेल व्यावसायिक, लॉजिंग, बोर्डिंगवाले, पापड, लोणचे मिरगुंड विक्रेते, पेढेवाले, छोटे मोठे दुकानदार व इतर व्यावसायिकांचा धंदा तेजीत होता. मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजले होते. परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते. भाविकांच्या सोयीसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती. विविध वस्तूंनी भरलेली दुकाने व गर्दी यामुळे मंदिर परिसर गजबजलेला दिसत होता. मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते. अनेक भाविक स्वतःची वाहने घेवून आले होते. तर काही लक्झरी किंवा खासगी बसेसने आले. यामुळे पालीतील रस्त्यावर वाहतूक कोंडी झाली होती. संकष्टी चतुर्थी असल्यामुळे मोठ्या प्रमाणात भाविक दर्शनासाठी आले होते.

**भाविकांच्या गर्दीचा अंदाज घेऊन योग्य व्यवस्थापन व नियोजन करण्यात आले होते. बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने भाविकांच्या सोयीसाठी शुद्‌ध पाणी व इतर व्यवस्था करण्यात आली. नाममात्र दरात प्रसादालयात प्रसाद उपलब्ध आहे. सुरक्षारक्षक तैनात आहेत. भाविकांसाठी दोन सुसज्ज भक्तनिवास आहेत. रांगेत उभे राहण्यासाठी रेलींग व शेड उभारण्यात आले आहेत. वाहनांसाठी देवस्थानची दोन भव्य मोफत पार्किंगही आहे. सुसज्ज स्वच्छतागृहेही आहेत. देवस्थान ट्रस्टतर्फे सर्वतोपरी योग्य व्यवस्था करण्यात आली आहे.**

**-जितेंद्र गद्रे, अध्यक्ष, बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्ट, पाली**


### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे-साईनगर (वाशिवली), ता. खालापुर, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे:

**-मिळकतीचे वर्णन-**
**मौजे-साईनगर (वाशिवली), ता. खालापुर, जि-रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर.पॉ. | आकारणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| मौजे-साईनगर (वाशिवली), ता. खालापुर | १. हरिश्चंद्र उर्फ बाळा भागोजी पाटील<br>२. जयप्रकाश भागोजी पाटील<br>३. साई विनोद पाटील<br>४. गुरुनाथ विनोद पाटील | १२/१ | **०.३६.७०**<br>**०.०८.८०**<br>**०.४५.५०** | **१.८१** |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिट्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तीना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणा-या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : ०३/०७ /२०२६**

सही/-
**ॲड. चित्तरंजन सुधाकर लाड**
**पत्ता-०३, श्री हरेकृष्णा को. ऑ. सोसायटी, प्लॉट नं. १२, सेक्टर ०५, नविन पनवेल ता. पनवेल जि. रायगड ४१०२०६, मो. क्र. ९६९९४९९९६३**



### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्‌वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **संजय नामदेव भोईर व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

मिळकतीचे वर्णन-: **विंधणे (५५३३२४)**
**(PU-ID: २२८११५४१२३५), तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट क्रमांक | भुधारणा पद्धत | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १७६/३ | १ | ०.३३.६० पो.ख. ०.०३.८० | २.४४ |
| | | एकूण – **०–३७–४०** | |

एकूण क्षेत्र ०.२१.७० गुंठ्याचे खरेदीखत

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठे करार, मिळकत विकसित करणे बाबतचा करार, कुळ हक्क, वारसाहक्क वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **७ दिवसांच्या** आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यास आपली लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क व हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेला कोणत्या हरकती व आक्षेप आमच्या आशीलांवर बंधनकारक राहणार नाही त्याची नोंद घ्यावी.

दिनांक – ०३/०७/२०२६

सही/-
**ॲड. निलेश बाळासाहेब झंजाड**

बी-१०४ सफायर सी.एच.एस.ली. भूखंड क्रमांक ३३/३४
सेक्टर २२ कामोठे ता. पनवेल जि. रायगड – ४१०२०९
मो.क्र- : ९९२०४ ७५८०१

# आयआयटीच्या आराखड्याने वाचणार पाम बीचची हिरवळ

## ४४० वृक्षांना जीवदान

**नवी मुंबई : बातमीदार**

पाम बीच मार्गावरील प्रस्तावित सानपाडा भुयारी मार्गासाठी तोडण्यात येणाऱ्या ४४०हून अधिक वृक्षांचे संरक्षण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आयआयटी-बॉम्बेने भुयारी मार्गाच्या आराखड्यात बदल सुचवत पर्यावरण संवर्धनाला प्राधान्य दिल्याने पर्यावरणप्रेमींमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले आहे.



या प्राथमिक आराखड्यानुसार पाम बीच मार्गावर फिल स्टॉप मॉलजवळून सानपाड्याकडे थेट प्रवेशमार्ग प्रस्तावित करण्यात आला आहे. तसेच केसर सॉलिटेअर परिसरात नवीन भुयारी मार्गाची जोडणी सुचविण्यात आली आहे. त्यामुळे मूळ आराखड्यात प्रस्तावित असलेली मोठ्या प्रमाणातील वृक्षतोड टाळता येईल, अशी पर्यावरणप्रेमींना आशा आहे. महापालिकेच्या मूळ आराखड्यात या प्रकल्पासाठी ४४०हून अधिक वृक्ष तोडण्याची किंवा अन्यत्र पुनर्लागवड करण्याची योजना होती. त्यामुळे स्थानिक नागरिक आणि पर्यावरणप्रेमींमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती. पर्यावरणपूरक पर्यायी आराखडा स्वीकारण्याची मागणी जोर धरत होती. याच पार्श्वभूमीवर पाम बीच ग्रीन्स, नॅटकनेक्ट फाउंडेशन आणि स्थानिक नागरिकांनी दोन वेळा मानवी साखळी आंदोलन केले. सोशल मीडियावर व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात आली.

अलीकडेच नॅटकनेक्ट फाउंडेशनने सुरू केलेल्या क्लायमेट ॲक्शन नाऊ या व्यासपीठावरही हा प्रश्न प्रमुख अजेंड्यावर असून वृक्षसंवर्धनासाठी सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार म्हणाले, "आमचा संघर्ष विकासाविरोधात नव्हता, तर अनावश्यक वृक्षतोडीविरोधात होता. योग्य नियोजन आणि पर्यायी अभियांत्रिकी उपायांद्वारे शेकडो वृक्ष वाचू शकतात, ही आमची भूमिका आयआयटी-बॉम्बेच्या प्राथमिक अहवालामुळे अधिक बळकट झाली आहे. आता नागरिकांच्या अपेक्षांनुसार महापालिकेने पर्यावरणपूरक निर्णय घ्यावा, हीच आमची अपेक्षा आहे."

पाम बीच ग्रीन्सचे श्रीकांत पत्की म्हणाले, "विकास व पर्यावरणापैकी एकाची निवड करण्याची वेळ येऊ नये हीच भूमिका होती. योग्य नियोजन, अभियांत्रिकीच्या माध्यमातून शेकडो वृक्ष वाचवणे शक्य असल्याचे आयआयटी-बॉम्बेच्या प्राथमिक अहवालातून स्पष्ट झाले. पालिका हा पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारून नवी मुंबईसाठी आदर्श निर्माण करेल, अशी अपेक्षा आहे." या सुधारित आराखड्याची अंतिम तांत्रिक तपासणी करून निर्णय पालिकेला घ्यायचा आहे. विकास आणि वृक्षसंवर्धन यांचा समतोल साधणारा निर्णय घेत नवी मुंबईसमोर शाश्वत विकासाचा आदर्श ठेवला जाईल, अशी पर्यावरणप्रेमींना अपेक्षा आहे.

# नमुंमपाची पावसाळी तयारी

## ७०००हून अधिक झाडांची छाटणी, नागरिकांना सतर्कतेचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई महानगरपालिकेच्या उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागामार्फत वृक्ष छाटणीचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. धोकादायक वृक्षांची पाहणी करून झाडे काढण्याचे काम प्रगतिपथावर असून आतापर्यंत आठ विभागांमध्ये एकूण ७०३६ झाडांची छाटणी पूर्ण करण्यात आली आहे. उद्यान विभागामार्फत आठ विभाग कार्यालयांमध्ये नऊ वृक्ष छाटणीची वाहने कार्यरत असून त्यांच्यामार्फत दररोज मोठ्या प्रमाणात कामे सुरू आहेत.

बेलापूर १४००, नेरूळ ५७८, तुर्भे ११५९, वाशी ११३, कोपरखैरणे ६७२, घणसोली १०१४, ऐरोली १६२२ व दिघा ४७८ अशी विभागनिहाय छाटणी केलेल्या झाडांची संख्या आहे. उद्यान सहाय्यकांनी वेळोवेळी कार्यक्षेत्रात पाहणी करून केलेल्या सर्व्हेनुसार तसेच महापालिकेकडे प्राप्त नगरसेवकांचे अर्ज, नागरिकांचे कॉल्स, व्हॉट्सॲप मेसेज, ग्रिव्हिअन्स ॲप अशा विविध माध्यमांतून प्राप्त होणाऱ्या तक्रारींनुसार ठिकठिकाणी अनेक वृक्षांच्या फांद्यांची छाटणी करण्यात आली आहे. याशिवाय नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सुकलेली, मृत आणि प्रथमदर्शनी धोकादायक अशी एकूण १०४ झाडे आढळून आली असून त्यांच्यावर कार्यवाही करण्यात आली आहे.

सद्यस्थितीत वादळी वाऱ्यासह होणाऱ्या मुसळधार पावसामुळे सुस्थितीत असलेली झाडेदेखील उन्मळून पडण्याच्या घटना घडत आहेत. नागरिकांकडून याबाबत दैनंदिन तक्रारी प्राप्त होत आहेत. त्यानुसार उन्मळून पडलेली झाडे, सोसाट्याच्या वारा-पावसामुळे पडलेल्या फांद्या तत्परतेने उचलण्याबाबत अग्निशामक विभाग, घनकचरा विभाग यांच्याशी समन्वय साधून ते तत्काळ हटवण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. नवी मुंबई महानगरपालिकेने नागरिकांना आवाहन केले आहे की, वादळी वाऱ्यासह असलेल्या पावसात झाडे पडण्याचा धोका वाढतो. त्यामुळे नागरिकांनी स्वतःची आणि इतरांच्या सुरक्षिततेसाठी काळजी घ्यावी.

झाडाखाली वाहन उभे करू नये. पावसात झाडाखाली उभे राहू नये. कमकुवत, झुकलेल्या झाडांपासून सुरक्षित अंतर राखावे. सोसायटीतील धोकादायक झाडांची वेळेवर छाटणी करून घ्यावी. रस्त्यावर झाड पडल्यास अथवा धोकादायक आढळल्यास संबंधित विभाग कार्यालयाला किंवा महापालिका मुख्यालयातील मध्यवर्ती आपत्ती व्यवस्थापन विभागाला १८००२२२३०९/१८००२२२३१० या टोल फ्री क्रमांकावर त्वरित कळवावे.

# फणसवाडीत पाळीव बदक गिळलेल्या अजगराला सर्पमित्रांनी दिले जीवदान

**नवी मुंबई : बातमीदार**

खारघर येथील फणसवाडी गावात दुपारी २ वाजण्याच्या सुमारास एका अजगराने पाळीव बदक गिळल्याची घटना घडली. या घटनेची माहिती पुनर्वसु फाउंडेशनला मिळताच सर्पमित्र अष्टविनायक मोरे व त्यांचे सहकारी मयूर मिसाळ तातडीने घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी पाहणी केली असता अजगराच्या पोटाचा आकार वाढलेला दिसत होता. स्थानिक नागरिकांनी सांगितले की, त्यांचे एक पाळीव बदक रात्रीपासून बेपत्ता होते. त्यावरून अजगराने ते बदक गिळल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला.

अजगर जवळच असलेल्या एका खोलीत असल्यामुळे त्याला सुरक्षितपणे पकडणे तुलनेने सोपे होते, मात्र अजगराने गिळलेले बदक बाहेर काढण्याची शक्यता जास्त असल्याने विशेष काळजी घेणे आवश्यक होते. गावकऱ्यांच्या विनंतीनुसार अजगराला तेथून तातडीने हलविण्याचे सांगण्यात आले. सर्पमित्रांनी अत्यंत सावधगिरीने त्याला खोलीबाहेर काढले, मात्र ज्या गोष्टीची भीती होती तेच



घडले. काही वेळातच अजगराने गिळलेले बदक बाहेर काढले. त्यानंतर कोणतीही इजा न होता अजगराला सुरक्षितपणे पकडण्यात आले.

रेस्क्यूनंतर सर्पमित्रांनी नागरिकांना सापांविषयी माहिती दिली. अजगर हा बिनविषारी असून पर्यावरणातील अन्नसाखळीचा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे तसेच साप दिसल्यास त्यांना इजा न करता तातडीने प्रशिक्षित सर्पमित्र किंवा वन विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.

# बंद पडलेल्या खात्यातील पैसे मिळणार परत!

**नवी मुंबई : बातमीदार**

अनेकदा नोकरीतील बदल, शहरांचे स्थलांतर किंवा अन्य कारणांमुळे नागरिक आपली जुनी बँक खाती वापरणे बंद करतात. कालांतराने या खात्यांकडे दुर्लक्ष होते आणि त्यातील जमा रकमेचा विसर पडतो, परंतु आता अशा विसरलेल्या किंवा हक्काच्या पैशांची चिंता करण्याची गरज नाही, कारण रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया नागरिकांना त्यांचे हक्काचे पैसे परत मिळवून देण्यासाठी पुढे आली आहे.

अनेक वर्षांपासून बँकांमध्ये पडून असलेल्या अशा 'दावा न केलेल्या ठेवी' शोधणे आणि त्या मूळ मालकांपर्यंत पोहोचवणे आता अत्यंत सोपे झाले आहे. बँकिंग नियमांनुसार जर एखादे बँक खाते सलग दोन वर्षांपेक्षा जास्त काळ निष्क्रिय राहिले तर ते 'इनऑपरेटिव्ह' मानले जाते. अशा खात्यांमधील रक्कम किंवा १० वर्षांपेक्षा अधिक काळ कोणताही व्यवहार न झालेल्या ठेवी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या

### आरबीआयची उदगम योजना

'ठेवीदार शिक्षण आणि जागरूकता निधी'मध्ये सुरक्षितपणे हस्तांतरित केल्या जातात, मात्र हा निधी आरबीआयकडे जमा झाला तरीही खातेदार किंवा त्यांचा कायदेशीर वारसदार या रकमेवर कधीही आपला हक्क सांगू शकतो आणि ती परत मिळवू शकतो.

नागरिकांना त्यांच्या अशा दाव्याविना पडून असलेल्या रकमांचा शोध सहज घेता यावा यासाठी रिझर्व्ह बँकेने 'उदगम' हे विशेष वेब पोर्टल सुरू केले आहे. नागरिक https://udgam.rbi.org.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन किंवा संबंधित बँकेच्या वेबसाइटवर जाऊन आपल्या जुन्या ठेवींची माहिती मिळवू शकतात. सध्या या पोर्टलवर तब्बल ३० बँकांमधील अशा रकमांची माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. पैसे परत मिळवण्यासाठी तीन सोपे टप्पेआपले विसरलेले पैसे परत मिळवण्यासाठी रिझर्व्ह बँकेने अत्यंत सोपी तीन टप्प्यांची प्रक्रिया स्पष्ट केली आहे.

खातेदाराला किंवा त्याच्या वारसदाराला संबंधित बँकेच्या कोणत्याही शाखेत भेट द्यावी लागेल; ती त्यांची मूळ किंवा नियमित शाखा नसली तरीही चालू शकते. ग्राहकाला आपले केवायसी म्हणजेच ओळख पटवणारी कागदपत्रे बँकेत सादर करावी लागतील. यासाठी आधार कार्ड, पासपोर्ट, मतदार ओळखपत्र किंवा ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी आवश्यक ती कागदपत्रे आणि योग्य फॉर्म भरून द्यावा लागेल. अंतिम टप्प्यात बँकेद्वारे कागदपत्रांची आणि खात्याची रीतसर पडताळणी केली जाईल. ही पडताळणी यशस्वी झाल्यानंतर खात्यात असलेली सर्व रक्कम लागू असल्यास व्याजासह खातेदाराला सुरक्षितपणे परत केली जाते.

मोहिमेला व्यापक करण्यासाठी व नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने 'जाणकार बना, सतर्क राहा!' असा संदेश दिला आहे. अधिक माहितीसाठी नागरिक https://rbikehtahai.rbi.org.in संकेतस्थळाला भेट किंवा ९९९९० ४१९३५ या रिझर्व्ह बँकेच्या अधिकृत व्हॉट्सॲप क्रमांकावर संपर्क साधून आपल्या शंकांचे निरसन करू शकतात.

# डी.के. ग्रुपकडून शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप

**उरण : बातमीदार**

एक हात मदतीचा या विचारसरणीने व फुले, शाहू, आंबेडकर विचारसरणीचे डी.के. ग्रुपचे अध्यक्ष दिनेश गायकवाड व त्यांचे सहकारी बळीराम मसन, कुणाल म्हात्रे यांनी करंजा येथील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा फिशरीज, करंजा, तालुका उरण, रायगड येथील शाळकरी मुलांना बॅग वाटप केले.

मुलांनी शिक्षणाकडे वळून शिक्षणाची कास पकडली पाहिजे, कारण शिक्षण हे आपल्या जीवनात बदल घडवू शकते, असे दिनेश गायकवाड यांनी सांगितले. जेव्हा गरज लागेल तेव्हा माझ्याकडून सर्वतोपरी मदत मिळेल, असे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी संकेत पाटील, ऋषिकेश कासारे, सुनील गायकवाड, तौफिक शेख, संतोष मोघे, विकास निकाळजे आदी उपस्थित होते.

छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून सोलापूर जिल्ह्यातील दहिटणे गाव येथील जिल्हा परिषद मराठी शाळेतील शाळकरी विद्यार्थ्यांनाही विकी बाबा चौधरी, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आय) गटाचे प्रदेश अध्यक्ष सोलापूर यांच्या उपस्थितीत दिनेश गायकवाड यांनी वही, पेन, पेन्सिल व शालेय उपयोगी वस्तूंचे वाटप केले.



# वासांबे ग्रुप ग्रामपंचायतीला टीबीमुक्त पंचायत पुरस्कार प्रदान

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन अभियानांतर्गत खालापूर तालुक्यातील वासांबे (मोहोपाडा) ग्रुप ग्रामपंचायतीला "टीबीमुक्त पंचायत २०२५" हा मानाचा पुरस्कार जाहीर करण्यात आला. ग्रामपंचायतीने क्षयरोग निर्मूलनासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला. पंचायत समिती सभागृह, खालापूर येथे आयोजित पुरस्कार वितरण समारंभात वासांबे ग्रामपंचायतीच्या सरपंच उमाताई मुंढे आणि ग्रामविकास अधिकारी वैभव पाटील यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

यावेळी गटविकास अधिकारी संदीप कराड, सभापती कृष्णा पारंगे आणि उपसभापती भाई शिंदे यांच्या



हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सन्मानामुळे वासांबे ग्रामपंचायतीच्या आरोग्यविषयक जनजागृती, क्षयरोग प्रतिबंधक मोहिमा आणि गावाला टीबीमुक्त ठेवण्यासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे कौतुक होत आहे. गावपातळीवर सातत्याने आरोग्य जनजागृती, तपासणी मोहिमा आणि नागरिकांच्या सहभागातून वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायतीने उभारलेला आदर्श इतर ग्रामपंचायतींसाठी प्रेरणादायी ठरत आहे. "टीबी हरेगा, देश जीतेगा" या घोषवाक्याला साजेसा वासांबे ग्रामपंचायतीचा हा सन्मान खालापूर तालुक्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

# कैरेतील क्रिस्टल कंपनीत साडेतीन लाखांचा अपहार

## रसायनी पोलिसांत गुन्हा दाखल

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील कैरे येथील क्रिस्टल व्हीजन ए.आर.के. प्रा. लि. कंपनीतून जामनगर येथे पाठवण्यात आलेल्या साडेतीन लाख रुपये किमतीच्या मालाचा वाहनचालकाने अपहार केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

क्रिस्टल व्हीजन ए.आर.के. प्रा. लि. कंपनीने जामनगर, गुजरात येथील क्रिस्टल कंपनीत एमएच ४८ सीबी २२०० या गाडीमध्ये ४० रोलर, किंमत दोन लाख ५० हजार रुपये, तसेच १९ चैनपुली ब्लॉक, किंमत एक लाख ३० हजार रुपये, असा एकूण तीन लाख ८० हजार रुपयांचा माल जामनगर ते कैरे येथे पोहोचवण्यासाठी भरला होता. हा माल आरोपी चालक नौशात अली (रा. प्रतापगड, उत्तर प्रदेश) याच्या ताब्यात विश्वासाने देण्यात आला होता, मात्र त्याने अप्रामाणिक हेतूने सदर मालाचा अपहार केला.

प्रदीप सुरथांच्या तक्रारीनुसार आरोपी नौशात अलीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# चिरनेरमध्ये संकष्ट चतुर्थीला भक्तिसागर

**उरण : वार्ताहर**

संकष्ट चतुर्थीनिमित्त शुक्रवारी (दि. ३) उरण तालुक्यातील चिरनेर येथील प्राचीन महागणपती क्षेत्रात भाविकांनी मोठ्या श्रद्धेने दर्शन घेतले. पावसाची तमा न बाळगता पहाटेपासूनच गणेशभक्तांनी मंदिरात गर्दी केली होती. पहाटे चार वाजल्यापासून गणेशभक्तांच्या दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले.

प्रथम महागणपतीची महापूजा व महाआरती करण्यात आली. त्यानंतर भाविकांनी दर्शनाला सुरुवात केली. अधूनमधून गर्दीचे प्रमाण थोडे कमी होत होते, मात्र पाऊस उघडीप देताच मंदिरातील गर्दी वाढत होती.



संकष्टी चतुर्थीच्या निमित्ताने हार, रानभाज्या, रानटी कंदमुळे तसेच अन्यपदार्थांच्या विक्रेत्यांनी दुकाने थाटली होती, मात्र या ठिकाणी फारशी गर्दी दिसून आली नाही. उरण शहरातील गणपती चौक येथील महागणपती मंदिर आणि मोऱ्याच्या विनायक येथील रिद्धी-सिद्धी मंदिरातही भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. दरम्यान, उरण तालुक्यातील चिरनेर येथील प्राचीन महागणपती क्षेत्राची महती अगदी दूरदूरपर्यंत पसरली आल्याने भाविक गणेश दर्शनासाठी येथे नित्यनेमाने येत असतात.

# साई ट्रस्ट शाळेत अभ्यास आणि चित्रकला सराव वर्गाचे उद्घाटन

**उरण : बातमीदार**

उज्ज्वल निकालाची परंपरा असलेल्या साई ट्रस्ट जवाहरलाल नेहरू पोर्ट माध्यमिक विद्यालयात १ जुलैला इयत्ता दहावीच्या अभ्यास वर्गाचे आणि चित्रकला ग्रेड परीक्षा अभ्यास वर्गाचे उद्घाटन साई ट्रस्टचे अध्यक्ष नरसू पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी शाळेचे प्रशासकीय अधिकारी रमाकांत गावंड, माध्यमिक विभाग मराठी माध्यमाचे मुख्याध्यापक गिरीश पाटील, इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक भूषण जाधव, इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक अंकुश जोगळे, इयत्ता दहावीचे विषय शिक्षक आणि चित्रकला शिक्षक उपस्थित होते.



अभ्यास वर्ग सुरू झाल्यामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये प्रचंड उत्साह आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी संस्थेचे अध्यक्ष नरसू पाटील यांनी विद्यार्थ्यांना कठोर परिश्रमाशिवाय पर्याय नाही, तसेच स्पर्धा स्वतःशी करा, असे सांगितले. येथील गुणवत्तावान शिक्षक शालेय वेळेव्यतिरिक्त वेळेत आपणाला मार्गदर्शन करणार आहेत, त्याचा जास्तीत जास्त लाभ आपण घ्यावा, असे ते म्हणाले.

प्रशासकीय अधिकारी रमाकांत गावंड यांनी विद्यार्थ्यांनी अधिकाधिक मेहनत घेऊन साई ट्रस्टचे नाव मोठे करावे, अशा शुभेच्छा दिल्या.

# धाटाव एमआयडीसीत नालेसफाईचे तीन तेरा!

## केमिकलयुक्त पाणी रस्त्यावर; ठेकेदारावर कारवाईची भाजपची मागणी





**धाटाव : प्रतिनिधी**

धाटाव औद्योगिक क्षेत्रात पावसाळयापूर्वी करण्यात आलेल्या नालेसफाईच्या कामात मोठा झोल झाल्याचा आरोप भाजपने केला आहे. कागदोपत्री नालेसफाई पूर्ण झाल्याचा दावा करण्यात आला असला, तरी प्रत्यक्षात अनेक ठिकाणी नाल्यांमधील गाळ, कचरा व साचलेले रासायनिक अवशेष न काढल्यामुळे पावसाच्या पाण्याचा निचरा होत नसून कारखान्यांबाहेर पाणी साचल्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.

रोहाडाय, प्रिव्ही, निलिकॉन, मजदा, आयन एक्सचेंज, अंशुल, सेंफ्रुट्रान्स, बॅक केमिकल्स आदी अनेक कारखान्यांच्या बाहेरील नाल्यांमध्ये पावसाचे व रासायनिक पाणी तुंबले असून अनेक चेंबर ओव्हरफ्लो झाले आहेत. परिणामी रस्त्यावर हिरव्या रंगाचे केमिकलयुक्त पाणी साचले असून संपूर्ण परिसरात दुर्गंधी पसरली आहे. या धोकादायक परिस्थितीमुळे कामगार, शाळकरी मुले, शेतकरी, महिला तसेच स्थानिक नागरिकांना याच केमिकलयुक्त पाण्यातून जीव धोक्यात घालून ये-जा करावी लागत आहे. काही कंपन्यांच्या व्यवस्थापकांनाही कार्यालयात जाताना या साचलेल्या पाण्यातून चालत जाण्याची वेळ आल्याचे समोर आले आहे.

अनेक कारखान्यांच्या अधिकाऱ्यांनीही यावर्षी नालेसफाईचे काम समाधानकारक झाले नसल्याचे सांगितले. काही ठिकाणी नाल्यातील गाळ काढून तो नाल्याच्या कडेलाच टाकण्यात आला. त्यानंतर झालेल्या पावसामुळे तोच गाळ पुन्हा नाल्यात वाहून गेल्याने संपूर्ण नालेसफाई केवळ दिखाऊ ठरल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या निकृष्ट दर्जाच्या कामाची तातडीने उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी तसेच संबंधित ठेकेदारावर कठोर कारवाई करून चौकशी पूर्ण होईपर्यंत त्याचे बिल अदा करू नये, अशी मागणी भाजपचे धाटाव विभाग अध्यक्ष सचिन मोरे यांनी केली आहे. प्रशासनाने या गंभीर प्रकाराकडे तातडीने लक्ष न दिल्यास भाजपचे रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग यांच्या नेतृत्वाखाली एमआयडीसी कार्यालयावर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही मोरे यांनी दिला आहे.

एमआयडीसीतील नालेसफाईच्या कामावर लाखो रुपये खर्च होत असताना प्रत्यक्षात नागरिकांना केमिकलयुक्त पाण्यातून मार्ग काढावा लागत असल्याने एमआयडीसी प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी परिसरातून जोर धरत आहे.

दरम्यान, या संदर्भात धाटाव एमआयडीसीचे उपअभियंता निशिकांत गीते यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, यावर्षी नियोजनानुसार नालेसफाईची कामे करण्यात आली आहेत. काही ठिकाणी गटारांची कामे सुरू असल्याने अथवा काही भागात किरकोळ कामे बाकी असू शकतात. अशा ठिकाणांची पाहणी करून आवश्यक ती नालेसफाई व दुरुस्तीची कार्यवाही करण्यात येईल.

# नशामुक्ती अभियानांतर्गत व्याख्यान



**पोलादपूर : प्रतिनिधी**

शिवाई शिक्षण प्रसारक मंडळ महाड संचलित चोळई येथील सुंदरराव मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात नशामुक्ती अभियानानिमित्त पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक विजय सुर्वे यांचे व्याख्यान झाले. विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्याचा यामागे उद्देश होता.

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि आजीवन अध्ययन व विस्तार कार्य विभाग यांच्या विद्यमाने आयोजित या व्याख्यानाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य सुनील बलखंडे व उपप्राचार्य डॉ. महेश वल्ले यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले. पोलादपूर पोलीस ठाण्याच्या सहकार्याने झालेल्या या व्याख्यानासाठी सहाय्यक निरीक्षक विजय सुर्वे, सहाय्यक फौजदार जयश्री सरणेकर, हवालदार अनुज शिंदे, शिपाई निकम, जाधव, तेलंगे, लांजरे आदी उपस्थित होते.

यावेळी प्रमुख मार्गदर्शक एपीआय विजय सुर्वे यांनी विद्यार्थ्यांना एनडीपीएस या कायद्याबद्दल विस्तृत माहिती दिली. नार्कोटिक्स ड्रग्स अँड सायकोट्रॉपिक सबस्टन्सेस (एनडीपीएस) कायदा १९८५ हा मादक द्रव्ये आणि सायकोट्रॉपिक पदार्थांचे उत्पादन, बाळगणे, विक्री, वाहतूक आणि सेवन यांचे नियमन व प्रतिबंध करणारा भारतातील प्रमुख कायदा आहे असे सांगून सुर्वे यांनी या कायद्यांतर्गत अफीम, गांजा, कोकेन, एमडी, एलएसडी इत्यादी पदार्थ स्वतःजवळ बाळगणे, अमली पदार्थांचे सेवन करणे, त्याचे उत्पादन करणे, साठवणूक करणे व विक्री करणे, अमली पदार्थाच्या उत्पादन, वाहतूक आणि विक्रीसाठी सहकार्य करणे इत्यादी गुन्ह्यांबाबत या कायद्यात शिक्षेची तरतूद करण्यात आली असल्याचे म्हटले. विद्यार्थ्यांनी अमली पदार्थांपासून तसेच तंबाखू, दारू, गुटखा यांसारख्या व्यसनांपासून स्वतःला दूर ठेवणे आवश्यक असल्याचे आवाहनही त्यांनी केले.

सहाय्यक फौजदार जयश्री सरनेकर यांनी महाविद्यालयातील विद्यार्थिनींची लक्षणीय संख्या लक्षात घेत मुली व महिलांसाठी उपलब्ध ११२, १०९१ हेल्पलाइन नंबर तसेच दामिनी पथकाबद्दल मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. राम बरकुले यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# क्षत्रिय मराठा समाज अध्यक्षपदी मंगेश सावंत

## संजोग मानकर यांची सचिवपदी निवड



**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

माणगाव तालुक्यातील क्षत्रिय मराठा समाज सुधारणा संघाच्या वार्षिक अधिवेशनात नव्या कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली. यामध्ये युवा कार्यकर्ते मंगेश सावंत यांची अध्यक्षपदी, तर संजोग मानकर यांची सचिवपदी एकमताने निवड करण्यात आली.

तालुक्याच्या कानाकोपऱ्यात विखुरलेल्या समाजबांधवांना एकत्र आणत समाजहिताचे कार्य करण्यासाठी सन १९५२मध्ये क्षत्रिय मराठा समाज सुधारणा संघाची स्थापना करण्यात आली. संघाने गेल्या सात दशकांहून अधिक काळ समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सातत्याने कार्य केले आहे. विशेषतः गेल्या काही वर्षांत युवकांच्या सक्रिय सहभागातून समाजोपयोगी उपक्रम, जनजागृती अभियान तसेच विविध सामाजिक कार्यक्रम राबविण्यात आले.

समाजाच्या सभागृहात झालेल्या वार्षिक अधिवेशनात भविष्यातील वाटचालीसंदर्भात महत्त्वपूर्ण ठराव मंजूर करण्यात आले. याच अधिवेशनात नव्या कार्यकारिणीची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. यात कार्याध्यक्ष प्रशांत अधिकारी, उपाध्यक्ष बळीराम लाड, संतोष शेलार, खजिनदार सुधीर खैरे, सहखजिनदार विश्वास खानविलकर,सहसचिव प्रमोद दळवी यांचा समवेश आहे. उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# व्हीबी-जी रामजी योजना शेतकऱ्यांसासाठी लाभदायक -मंत्री गोगावले



**अलिबाग : प्रतिनिधी**

भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयांतर्गत राबविण्यात येणारी व्हीबी-जी रामजी अर्थात विकसित भारत रोजगार आणि आजिविका हमी मिशन (ग्रामीण) ही योजना जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या शाश्वत विकासासाठी अत्यंत लाभदायक ठरणार असल्याचे प्रतिपादन रोजगार हमी योजना व खारभूमी विकासमंत्री भरत गोगावले यांनी केले.

जिल्हा नियोजन भवन, अलिबाग येथे विकसित भारत रोजगार आणि आजिविका हमी मिशन (ग्रामीण) योजनेच्या जिल्हास्तरीय शुभारंभ कार्यक्रमात दूरदृश्यप्रणालीद्वारे ते बोलत होते.

कार्यक्रमास जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पशुसंवर्धन व कृषी सभापती वैकुंठ पाटील, उपजिल्हाधिकारी (रोहयो) तथा उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक रवींद्र राठोड, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे आदी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना मंत्री गोगावले म्हणाले की, भारत सरकारने विकसित भारत रोजगार आणि आजिविका हमी मिशन (ग्रामीण) अधिनियम २०२५ मंजूर केला असून सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या जागी विकसित भारत रोजगार आणि आजिविका हमी मिशन (ग्रामीण) योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेची अंमलबजावणी १ जुलैपासून सुरू करण्यात आली आहे. केंद्र शासनाने अधिसूचित केलेल्या संबंधित केंद्रीय कायदा २०२५शी सुसंगत तरतुदींचा समावेश करून महाराष्ट्र राज्यात ही योजना प्रभावीपणे राबविण्यास राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. या योजनेंतर्गत ग्रामीण अकुशल कामगारांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या रोजगाराची मर्यादा १०० मनुष्यदिवसांवरून १२५ मनुष्यदिवसांपर्यंत वाढविण्यात आली आहे तसेच योजनेंतर्गत हाती घेता येणाऱ्या कामांच्या प्रकारांची संख्या २५६वरून ३१८पर्यंत वाढविण्यात आली आहे.

या महत्त्वपूर्ण सुधारणांमुळे ग्रामीण भागात रोजगारनिर्मितीला चालना मिळण्याबरोबरच शाश्वत मालमत्ता निर्माण होण्यास मोठी मदत होणार आहे. योजनेची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी ग्रामपंचायती, पंचायत समित्या, जिल्हा परिषद, विविध शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच स्वयंसेवी संस्थांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. या माध्यमातून ग्रामीण भागातील गरजू व अकुशल मजुरांना अधिक प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. जलसुरक्षा, ग्रामीण पायाभूत सुविधा, उपजीविका विकास आणि हवामान लवचिकता या चार प्राधान्य क्षेत्रांमध्ये कामे राबवून शाश्वत विकास साध्य करण्याचा उद्देश आहे. ही योजना जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या हिताची असून अधिकाऱ्यांनी तिचा लाभ तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, असे निर्देशही त्यांनी दिले. कोकण हा पर्यटन व औद्योगिकीकरणासाठी महत्त्वाचा प्रदेश असून जिल्ह्यात रोजगारवाढीसाठी शासनाकडून सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले की, विकसित भारत रोजगार आणि आजिविका हमी मिशन (ग्रामीण) ही जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणारी महत्त्वाकांक्षी योजना आहे. सर्व प्रशासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम केल्यास या योजनेचा लाभ तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहचविता येईल.जिल्ह्यात कृषी विभागामार्फत ७०० शेततलावांची निर्मिती करण्यात आली असून या तलावांमध्ये १५ ऑगस्ट रोजी शासनामार्फत मत्स्यबीज सोडण्यात येणार आहे. त्यामुळे मत्स्यव्यवसायालाही चालना मिळणार आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि त्यांना अधिकाधिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ही योजना उपयुक्त ठरणार आहे तसेच बांबूपासून कपडे, कागद, निवारा आदी विविध उत्पादने तयार होत असल्याने ग्रामपंचायत हद्दीत अधिकाधिक बांबूची लागवड करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी विकसित भारत रोजगार आणि आजिविका हमी मिशन (ग्रामीण) योजनेंतर्गत नवीन कामांचे कार्यादेश मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना वितरित करण्यात आले. या कार्यक्रमास विविध शासकीय विभागांचे अधिकारी, कर्मचारी तसेच महिला बचत गटांच्या सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# विश्वरूप प्रतिष्ठानतर्फे विद्यार्थिनींना बॅगचे वाटप



**नागोठणे : बातमीदार**

शिक्षण हीच खरी संपत्ती आहे आणि प्रत्येक मुलीला शिक्षणाची समान संधी मिळाली पाहिजे या भावनेतून विश्वरूप प्रतिष्ठानच्या वतीने अध्यक्षा रोहिणी सतीश धारप यांच्या हस्ते नागोठणे येथे महाविद्यालयीन विद्यार्थिनींना शैक्षणिक बॅगचे वाटप करण्यात आले.

ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थिनी प्रतिकूल परिस्थितीतही उच्च शिक्षण घेण्यासाठी धडपडत आहेत. अशा विद्यार्थिनींच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे आणि त्यांचा आत्मविश्वास वाढावा या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाचे नियोजन श्रेया कुंटे यांनी केले.

कार्यक्रमास नुकतेच पदभार स्वीकारलेले एपीआय श्री. पाखरे, भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते, विश्वरूप प्रतिष्ठानचे खजिनदार वसंत शेडगे, मीनलताई, ज्योतीताई तसेच पदाधिकारी, सभासद, पालक आणि नागरिक उपस्थित होते.

# कृषिदिनानिमित्त प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मान



**धाटाव : प्रतिनिधी**

हरित क्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त रोहा पंचायत समिती आयोजित कृषी दिन कार्यक्रम प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मान, कृषी अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन उपक्रमांतर्गत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांनी रसायनमुक्त सेंद्रिय शेतीवर अधिक भर द्यावा,, त्यासाठी सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही सभापती विजया पाशिलकर यांनी दिली.

उपसभापती संजय मांडलूस्कर, गटनेते किसन मोरे, जिल्हा परिषद सदस्य निधी जाधव, उर्वशी वाडकर, पंचायत समिती सदस्य सुरेश मगर, जगन्नाथ धनवडे, समृद्धी कोळी, गटविकास अधिकारी अमृता उंडरे-पाटील, विस्तार अधिकारी दिलीप पाबरेकर, सहाय्यक गटविकास अधिकारी मनोज लाटे, प्रथमेश डाके, दीपक फाउंडेशनचे दीपक ठोसर, पाणी फाउंडेशनचे प्रतिनिधी, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपसभापती संजय मांडलूस्कर यांनी शेतकरी जगला तर देश जगेल, असे प्रतिपादन करत तरुणांनी शेतीकडे वळणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले.

प्रास्ताविकात कृषी अधिकारी राखी उपनवर यांनी कृषी दिनाचे महत्त्व विशद करून शासनाच्या विविध योजनांचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन केले.

कृषीतज्ज्ञ जीवन आरेकर यांनी आधुनिक व पारंपरिक शेतीचे महत्त्व, हवामान बदल व एल निनोच्या परिणामांचा शेतीवर होणारा प्रभाव, एकात्मिक शेतीची आवश्यकता, तसेच शेळीपालन, कुक्कुटपालन, दुग्ध व्यवसाय आणि मत्स्य व्यवसाय यांसारख्या जोडधंद्यांचे महत्त्व यावर सविस्तर मार्गदर्शन केले. पाणी व्यवस्थापन, मृदा परीक्षण आणि कृषी उत्पादनाच्या बाजारपेठ व्यवस्थापनाबाबतही आरेकर यांनी शेतकऱ्यांना माहिती दिली.

प्रदीक पावस्कर यांनी दुधाळ जनावरे, शेळी-मेंढी पालन, कुक्कुटपालन तसेच राज्य व जिल्हास्तरीय योजनांची माहिती दिली. कृषी विस्तार अधिकारी ऋषिकेश कदम यांनी राज्य व केंद्र शासनाच्या विविध कृषीपूरक योजनांबाबत मार्गदर्शन केले. नेहा पाटील यांनी उमेद बचत गटांच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या संधींची माहिती दिली.

यावेळी प्रगतशील शेतकऱ्यांचा विशेष सन्मान यावेळी करण्यात आला. उपस्थितांचे आभार विस्तार अधिकारी महारुद्र फडतरे यांनी मानले.

# खोपोलीत पालक समुपदेशन आणि बालविकास परिसंवाद



**खोपोली : प्रतिनिधी**

सजग पालकत्वातूनच सुसंस्कृत, संवेदनशील आणि आत्मविश्वासपूर्ण पिढी घडू शकते असा संदेश देणारा दोन दिवसीय पालक समुपदेशन व बालविकास परिसंवाद केटीएसपी मंडळ संचलित डॉ. रामहरी धोटे शिशु मंदिर, खोपोली येथे उत्साहात पार पडला. पूर्वप्राथमिक विभागासाठी आयोजित या उपक्रमाला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शाळेच्या रामशेठ ठाकूर सभागृहात आयोजित या परिसंवादात आकुर्डी (पुणे) येथील प्रख्यात समुपदेशक संदीप मोरे यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून पालकांना मार्गदर्शन केले. मुलांचा सर्वांगीण विकास, सकारात्मक पालकत्व, मुलांच्या भावनिक गरजा, प्रभावी संवाद, योग्य संस्कार, डिजिटल युगातील पालकांची भूमिका तसेच घरातील सकारात्मक वातावरणाचे महत्त्व या विविध विषयांवर त्यांनी उदाहरणांसह मार्गदर्शन केले.

मुलांमध्ये आत्मविश्वास, मूल्याधिष्ठित विचार आणि जबाबदारीची भावना विकसित करण्यासाठी पालकांनी मुलांसोबत अधिक वेळ घालवावा, त्यांचे मन समजून घ्यावे आणि संवाद वाढवावा, असे आवाहन श्री. मोरे यांनी केले.

प्रारंभी शाळेच्या मुख्याध्यापिका सुनिता चव्हाण यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. पूर्वप्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका आशा देशमुख यांनी परिचय करून दिला. या उपक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष विजय चुरी यांचे सहकार्य लाभले. शहनाज पानसरे व चित्रा शिंगारे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# रोहा रोटरी सेंट्रलतर्फे डॉक्टर्स दिन साजरा

**रोहा : प्रतिनिधी**

रोटरी क्लब रोहा सेंट्रल तर्फे डॉक्टर्स डेच्या निमित्ताने विविध डॉक्टरांचा सन्मान करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

नवनिर्वाचित अध्यक्ष लक्ष्मण मोरे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या उपक्रमासाठी क्लबचे माजी अध्यक्ष व नगर परिषदेचे सभापती महेंद्र दिवेकर, सचिव मनोज बोराणा, खजिनदार रूपेश चौधरी, प्रेसिडेंट इलेक्ट राकेश कागडा, माजी अध्यक्ष विजय दिवकर, दीपक सिंग, निखिल दाते आदी सदस्य उपस्थित होते.



# दमदार पावसामुळे शेतीकामांना वेग



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड परिसरात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले असले, तरी शेतकऱ्यांसाठी हा पाऊस दिलासादायक ठरला आहे. या दमदार पावसामुळे शेतकरीवर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पावसाअभावी पेरणीनंतर राब वाढीबाबत चिंता होती, पण जोरदार पावसामुळे राबांना नवसंजीवनी मिळाली आहे. या पावसाचा खरीप हंगामातील पिकांना मोठा फायदा होणार असून शेतांमध्ये पुरेसा ओलावा निर्माण झाला आहे.

अनेक भागांतील विहिरी, तलाव आणि जलसाठे भरण्यास सुरुवात झाल्याने पाण्याची टंचाईसुद्धा दूर होण्याची आशा व्यक्त केली जात आहे.

# स्वित्झर्लंडचा ऐतिहासिक विजय



## फिफा वर्ल्डकपच्या नॉकआऊट फेरीत दाखल

**व्हँकुव्हर : वृत्तसंस्था**

ब्रील एम्बोलो आणि डॅन न्दोये यांच्या शानदार गोलच्या जोरावर स्वित्झर्लंडने अल्जेरियाचा २-०ने पराभव करत विश्वचषकाच्या १६ संघांच्या (नॉकआऊट) फेरीत धडक मारली आहे. या विजयामुळे स्विस संघ आता पुढील मंगळवारी व्हँकुव्हरमध्ये होणाऱ्या नॉकआऊट सामन्यासाठी सज्ज झाला आहे.

सामन्याच्या सुरुवातीला पहिल्या १० मिनिटांत अल्जेरियाचे वर्चस्व दिसून आले होते, मात्र त्यानंतर स्वित्झर्लंडने सामन्याची सूत्रे हाती घेतली. योहान मानझांबीच्या चपळ असिस्टवर ब्रील एम्बोलोने गोल करून संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. एम्बोलोचा हा २६वा आंतरराष्ट्रीय गोल ठरला.



दुसऱ्या हाफची सुरुवात होताच अवघ्या काही सेकंदात डॅन न्दोयेने बॉक्सच्या बाहेरून एक जोरदार फटका मारला. अल्जेरियाचा गोलकीपर लुका झिदानने झेप घेऊन चेंडू अडवण्याचा प्रयत्न केला, मात्र चेंडू वेगाने जाळ्यात शिरला आणि स्वित्झर्लंडची आघाडी २-० झाली. ८१व्या मिनिटाला फॅबियन रायडरने तिसरा गोल करण्याची संधी निर्माण केली होती, परंतु थोडक्यात ती हुकली.

स्वित्झर्लंडने १९३८नंतर बाद फेरीतील एकही सामना जिंकलेला नाही. त्यामुळे यंदाच्या कामगिरीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या स्पर्धेत २० वर्षीय मानझांबी स्विस संघाचा उदयोन्मुख तारा म्हणून समोर आला आहे. दोन गोल आणि दोन असिस्टसह त्याने आपल्या खेळाचा प्रभाव पाडला आहे. संघाची पुढील लढत आता कोलंबिया किंवा घाना यांपैकी विजेत्या संघाशी होईल.

दुसरीकडे २०१४नंतर प्रथमच विश्वचषकात पुनरागमन करणाऱ्या अल्जेरियासाठी ही स्पर्धा निराशाजनक ठरली.

# इंग्लंड महिला संघ टी-२० वर्ल्डकप फायनलमध्ये!

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंडची कर्णधार नॅट सायव्हर-ब्रंटच्या दमदार खेळीच्या जोरावर इंग्लंडच्या संघाने घरच्या मैदानात दिमाखदार विजयासह फायनलमध्ये धडक मारली. दुसरीकडे दक्षिण आफ्रिकेच्या नशिबी पुन्हा 'चोकर्स'चा ठपका पडला. यजमान इंग्लंडने महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या दुसऱ्या उपांत्य फेरीत दक्षिण आफ्रिकेचा ४० धावांनी पराभव केला.

पहिल्यांदा फलंदाजी करताना इंग्लंडची सुरुवात अत्यंत खराब झाली होती. अवघ्या २३ धावांत आघाडीच्या तीन बॅटर्स माघारी फिरल्या. संघ अडचणीत असताना दुखापतीतून सावरून संघात परतलेल्या नॅट सायव्हर-ब्रंट आणि हीदर नाइट दोघींनी चौथ्या विकेटसाठी ९० चेंडूंमध्ये १३३ धावांची भागीदारी रचत संघाचा डाव सावरला. या दोघींच्या अर्धशतकाच्या जोरावर इंग्लंडच्या संघाने २० षटकांत पाच विकेट्सच्या मोबदल्यात १६९ धावांपर्यंत मजल मारत दक्षिण आफ्रिकेसमोर १७० धावांचे लक्ष्य ठेवले होते.

१७० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा लॉरा वॉल्व्हार्ड

### द. आफ्रिका पुन्हा 'चोकर्स'



हिला सुरुवातीच्या तीन षटकांत फारशी स्ट्राईकच मिळाली नाही. तिने पहिल्या चार चेंडूंमध्ये केवळ दोन धावा केल्या. धावगती वाढवण्याच्या नादात मोठा फटका खेळताना तिने विकेट गमावली. सोफीने तिच्या रूपात इंग्लंडच्या संघाला पहिले यश मिळवून दिले. या धक्क्यातून दक्षिण आफ्रिकेचा संघ सावरलाच नाही. आफ्रिकेचा डाव २० षटकांत ८ बाद १२९ धावांवर आटोपला.

### आता ऑस्ट्रेलियाचे आव्हान!

इंग्लंडने २००९मध्ये झालेल्या पहिल्या महिला टी-२० विश्वचषकाचे विजेतेपद पटकावले होते. त्यानंतर तब्बल १७ वर्षांनंतर संघाला पुन्हा एकदा विजेतेपद जिंकण्याची संधी मिळाली आहे. आता ५ जुलैला लॉर्ड्सच्या ऐतिहासिक मैदानात होणाऱ्या अंतिम सामन्यात इंग्लंडसमोर सहा वेळच्या विजेत्या ऑस्ट्रेलियाचे आव्हान असणार आहे.

# पोर्तुगालचा क्रोएशियावर थरारक विजय



**टोरंटो : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषकाच्या 'राऊंड ऑफ ३२' सामन्यात पोर्तुगालने क्रोएशियाचा २-१ असा थरारक पराभव करत 'राऊंड ऑफ १६'मध्ये प्रवेश केला. अतिरिक्त वेळेतील व्हीएआर निर्णयामुळे हा सामना अधिकच रंगतदार ठरला.

सामन्याच्या पहिल्या सत्रात पोर्तुगालचा स्टार खेळाडू ख्रिस्तियानो रोनाल्डो आणि ब्रुनो फर्नांडिस यांना गोल करण्याच्या संधी मिळाल्या, मात्र क्रोएशियाच्या भक्कम बचावफळीने त्या निष्फळ ठरवल्या. दुसऱ्या सत्राच्या सुरुवातीलाच इव्हान पेरिसिक याने गोल करत क्रोएशियाला १-० अशी आघाडी मिळवून दिली.

यानंतर पोर्तुगालला व्हीएआरच्या हस्तक्षेपामुळे मोठी संधी मिळाली. कॉर्नर किकदरम्यान बचावपटू रेनाटो वेइगा याला दंडक्षेत्रात पाडण्यात आले. सुरुवातीला पंचांनी खेळ सुरू ठेवला होता, मात्र व्हीएआर तपासणीनंतर त्यांनी निर्णय बदलत पोर्तुगालला पेनल्टी बहाल केली. पेनल्टीवर ख्रिस्तियानो रोनाल्डो याने अचूक गोल करत सामना १-१ असा बरोबरीत आणला. यानंतर बदली खेळाडू गोंसालो रामोस याने निर्णायक गोल करत पोर्तुगालला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. अतिरिक्त वेळेत जोस्को ग्वार्डिओल याने क्रोएशियासाठी गोल केला होता, मात्र चेंडूच्या उभारणीत ऑफसाइड झाल्याचे व्हीएआर तपासणीत स्पष्ट झाल्याने हा गोल रद्द करण्यात आला. या विजयासह पोर्तुगालने 'राऊंड ऑफ १६'मध्ये धडक मारली असून त्यांचा सामना स्पेनविरुद्ध होणार आहे.

# टीम इंडिया पुढील महिन्यात श्रीलंका दौऱ्यावर

## दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघ पुढील महिन्यात श्रीलंकेविरुद्ध दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळणार आहे. या मालिकेच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. पहिला सामना १५ ते १९ ऑगस्टदरम्यान गॉल येथे, तर दुसरा कसोटी सामना २३ ते २७ ऑगस्टदरम्यान सिंहलीज स्पोर्ट्स क्लबमध्ये खेळला जाईल. २०२५-२७च्या जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या दृष्टीने भारतीय संघासाठी ही एक महत्त्वपूर्ण मालिका आहे.



भारतीय संघाने अफगाणिस्तानविरुद्ध एक कसोटी सामना खेळून जिंकला आहे. भारताची अलीकडील कसोटी कामगिरी खराब राहिली आहे. यामुळेच संघ जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेत पाचव्या क्रमांकावर आहे. दुसरीकडे श्रीलंका भारतापेक्षा एक स्थान खाली सहाव्या क्रमांकावर आहे. २०२७मध्ये डब्ल्यूटीसीच्या अंतिम फेरीत पोहचण्यासाठी भारताला आपले उर्वरित बहुतेक कसोटी सामने जिंकावे लागतील.

भारत २०१७नंतर प्रथमच कसोटी मालिकेसाठी श्रीलंकेचा दौरा करणार आहे. यापूर्वी दोन्ही क्रिकेट मंडळांनी या दौऱ्यात तीन टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांचा समावेश करण्याच्या शक्यतेवर चर्चा केली होती, पण टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेचा कोणताही उल्लेख नाही. त्यामुळे सध्या केवळ दोन कसोटी सामन्यांची मालिकाच निश्चित मानली जात आहे.

### उभय संघांची कामगिरी

आतापर्यंत दोन्ही संघ ४६ कसोटी सामन्यांमध्ये एकमेकांसमोर आले आहेत. यापैकी भारताने २२ कसोटी सामने जिंकले आहेत. सात सामने श्रीलंकेने जिंकले, तर १७ सामने अनिर्णित राहिले आहेत. भारत २०१७नंतर प्रथमच कसोटी मालिकेसाठी श्रीलंकेचा दौरा करणार आहे. भारताने श्रीलंकेविरुद्ध सलग पाच कसोटी मालिका जिंकल्या आहेत. त्यामुळे भारतीय संघ आताही विजय मिळवण्याच्या प्रयत्नात असणार आहे.

# स्पेनची उपांत्यपूर्व फेरीत धडक



**लॉस एंजेलिस : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषकाच्या राऊंड ऑफ ३२ सामन्यात स्पेनने ऑस्ट्रियाचा ३-० असा एकतर्फी पराभव करत उपांत्यपूर्व फेरीत दमदार प्रवेश केला. स्पेनच्या विजयाचा शिल्पकार ठरलेल्या मिकेल ओयारझाबाल याने दोन गोल झळकावले, तर पेद्रो पोरो याने एक गोल करत संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

सामन्याच्या ३६व्या मिनिटाला मार्क कुकुरेला याच्या अचूक मागील पासवर मिकेल ओयारझाबालने गोल करत स्पेनला १-० अशी आघाडी मिळवून दिली.

दुसऱ्या हाफमध्ये ६६व्या मिनिटाला पेद्रो पोरोने शानदार गोल करत स्पेनची आघाडी २-० अशी दुप्पट केली. विशेष म्हणजे, वरिष्ठ आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील हा त्याचा पहिलाच गोल ठरला.

सामन्याच्या ८९व्या मिनिटाला पुन्हा एकदा मार्क कुकुरेला आणि मिकेल ओयारझाबाल यांच्या उत्कृष्ट समन्वयातून स्पेनने तिसरा गोल केला आणि ३-० असा दणदणीत विजय निश्चित केला.

या विजयासह स्पेनने तब्बल १६ वर्षांनंतर विश्वचषकाच्या बाद फेरीत विजयाची नोंद केली. याआधी स्पेनने २०१०च्या विश्वचषकात बाद फेरीतील सामना जिंकला होता आणि त्याच वर्षी विश्वविजेतेपदही पटकावले होते. आता उपांत्यपूर्व फेरीत स्पेनचा सामना पोर्तुगाल किंवा क्रोएशिया यांच्यापैकी एका संघाशी होणार आहे.

# करणबीर सिंगने मोडला रोहित शर्माचा रेकॉर्ड

**जीबी ओव्हल : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रिया आणि हंगरी या दोन्ही संघांमध्ये झालेल्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात ऑस्ट्रियाच्या करणबीर सिंगने अवघ्या ५७ चेंडूंचा सामना करत १६४ धावांची खेळी केली. या दरम्यान त्याने १८ चौकार आणि १२ षटकार खेचले. यासह त्याने 'हिटमॅन' रोहित शर्माचा मोठा रेकॉर्ड मोडला आहे.

या १२ षटकारांसह तो टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार मारणाऱ्या फलंदाजांच्या यादीत अव्वल स्थानी पोहचला आहे. रोहित शर्माच्या नावे टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २०५ षटकार खेचण्याची नोंद आहे. आता करणबीरने हा रेकॉर्ड मोडून काढला आहे. त्याच्या नावे २०७ षटकार खेचण्याची नोंद झालीय.

# स्टोक्सने केला दुर्मीळ विक्रम



**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंडचा माजी कर्णधार बेन स्टोक्सने काही दिवसांपूर्वीच अचानक निवृत्तीचा निर्णय जाहीर केला. अनेक विक्रम नावावर असलेल्या स्टोक्सने निवृत्त होता होता एक अनोखा दुर्मीळ विक्रम नावावर केला आहे.

शेवटच्या कसोटीत स्टोक्स दुसऱ्या डावात सलामीला आला होता. कारकिर्दीत प्रामुख्याने पाच आणि सहा क्रमांकावर खेळणाऱ्या स्टोक्सने न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेत सातव्या क्रमांकावर यायला सुरुवात केली होती, मात्र शेवटच्या कसोटीत सामना जिंकण्याच्या दृष्टिकोनातून आक्रमक पवित्र्यानिशी खेळण्यासाठी स्टोक्स सलामीला उतरला. हे होताच कसोटीत सर्व क्रमांकवर खेळण्याचा विक्रम त्याच्या नावावर नोंदला गेला. पण हा विक्रमाचा एक भाग झाला. स्टोक्सने गोलंदाजी करताना सर्व क्रमांकांवर म्हणजेच १ ते ११ क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या फलंदाजाला बाद केले आहे. हे दोन्ही करणारा स्टोक्स कसोटी क्रिकेटच्या इतिहासातील एकमेव खेळाडू आहे.

या विक्रमाची आणखी एक मेख आहे. ११ विविध क्रमांकांवर खेळलेल्या फलंदाजांचे झेलही स्टोक्सने टिपले आहेत. हा विक्रम करणारा स्टोक्स पहिलाच आहे. संघाची जी आवश्यकता असेल त्यानुसार खेळणे हे स्टोक्सने प्रमाण मानले. म्हणूनच तो विशेष ठरला.

# दिवंगत सहकाऱ्याच्या आठवणीने रोनाल्डोच्या डोळ्यांत अश्रू



**टोरंटो : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक स्पर्धेत गुरुवारी रात्री पोर्तुगालने क्रोएशियाचा २-१ असा पराभव करत रोमहर्षक विजय मिळवला, मात्र हा विजय पोर्तुगालसाठी केवळ पुढच्या फेरीत जाण्याचा आनंद देणारा ठरला नाही, तर एका दिवंगत सहकाऱ्याच्या आठवणीने संपूर्ण संघ भावूक झाला. पोर्तुगालचा स्टार फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डो सामना संपल्यानंतर मैदानातच भावूक झाला आणि बाहेर पडताना त्याला आपले अश्रू आवरता आले नाहीत.

या विशेष सामन्यात रोनाल्डोने त्याची जगप्रसिद्ध '७ नंबर'ची जर्सी बाजूला ठेवून आपला दिवंगत सहकारी डियोगो जोटा याची '२१ नंबर'ची जर्सी परिधान करून मैदानात उतरला होता. पोर्तुगालच्या संपूर्ण संघाने जोटा याला अनोखी श्रद्धांजली वाहिली. ३ जुलै २०२६ रोजी जोटाच्या निधनाला एक वर्ष पूर्ण झाल्याने या ठवणींना उजाळा देण्यात आला.

लिव्हरपूलचा स्टार फॉरवर्ड डियोगो जोटा आणि त्याचा भाऊ आंद्रे सिल्व्हा यांचा ३ जुलै २०२५ रोजी स्पेनमध्ये एका भीषण अपघातात मृत्यू झाला होता. विशेष म्हणजे, लग्नाच्या अवघ्या ११ दिवसांनंतर हा अपघात झाला होता. जोटाने त्याची मैत्रीण रुटे कार्डोसो हिच्याशी विवाह केला होता, मात्र नियतीने हा आनंद फार काळ टिकू दिला नाही.

# फिफा वर्ल्डकपमध्ये रेड कार्डचा वाद

## फालोरिन बालोगुनच्या निलंबनानंतर पंचांच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह



**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

विश्वचषकाच्या मैदानात सध्या 'रेड कार्ड'चा मुद्दा केंद्रस्थानी आला आहे. अमेरिकेचा स्टार स्ट्रायकर फालोरिन बालोगुन याला मिळालेल्या एका वादग्रस्त रेड कार्डमुळे केवळ खेळाडू आणि चाहतेच नव्हे, तर फुटबॉल तज्ज्ञही संतप्त झाले आहेत. या घटनेने फुटबॉलमधील शिस्तबद्ध कारवाई आणि पंचांच्या निर्णयांवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

अमेरिका आणि बोस्निया-हर्झेगोविना यांच्यातील सामन्यात अमेरिका २-०ने आघाडीवर असताना, दुसऱ्या हाफमध्ये फालोरिन बालोगुनला रेड कार्ड दाखवून मैदानाबाहेर काढण्यात आले. पंचांनी सुरुवातीला हा निर्णय दिला नव्हता, परंतु व्हिएआर प्रणालीद्वारे रिप्ले पाहिल्यानंतर हा कठोर निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे बालोगुनला बेल्जियमविरुद्धच्या महत्त्वाच्या सामन्याला मुकावे लागणार आहे.

अमेरिकेचे प्रशिक्षक मॉरिसिओ पोचेटिनो यांनी या निर्णयाचा निषेध केला आहे. "हा फाऊल हेतुपुरस्सर नव्हता. चेंडूसाठी लढताना पाय जमिनीवर टेकणे ही एक नैसर्गिक क्रिया आहे," असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले.

स्टार खेळाडूंना विशेष वागणूक?

या वादाने एक जुना प्रश्न पुन्हा जिवंत केला आहे की, "स्टार खेळाडूंना पंचांकडून विशेष सवलत मिळते का?" समीक्षकांचा असा आरोप आहे की, लिओनेल मेस्सीसारख्या मोठ्या खेळाडूंनी केलेल्या गंभीर फाऊलकडे दुर्लक्ष केले जाते, तर बालोगुनसारख्या खेळाडूंना कठोर शिक्षेला सामोरे जावे लागते. अमेरिकन डिफेंडर वेस्टन मॅकेनी यांनीही या दुटप्पी धोरणावर नाराजी व्यक्त केली आहे.

# वैभव सूर्यवंशीला आंतरराष्ट्रीय पदार्पणाची संधी कधी?

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सध्या एकच नाव तुफान चर्चेत आहे, ते म्हणजे वैभव सूर्यवंशी. १५ वर्षांचा हा मुलगा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील नावाजलेल्या गोलंदाजांची अशी धुलाई करतो. या कामगिरीच्या बळावर त्याला आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय संघात स्थान देण्यात आले आहे, पण अजूनही पदार्पणाची संधी देण्यात आलेली नाही.

आयर्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेत वैभवला पदार्पणाची संधी दिली जाणार असल्याची चर्चा रंगली होती, पण या मालिकेत तो बाकावरच बसून राहिला. त्यानंतर इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या सामन्यातही त्याचे पदार्पण झाले नाही. आता दुसरा सामना शनिवारी आहे.

गौतम गंभीरने जेव्हापासून भारतीय संघाच्या मुख्य प्रशिक्षकाची जबाबदारी सांभाळली आहे, तेव्हापासून त्याने एकाच गोष्टीवर अधिक भर दिला आहे, ते म्हणजे 'स्टार कल्चर' पूर्णपणे संपवून टाकायचे. वैभव सूर्यवंशी जेव्हापासून आयपीएल स्पर्धेत चमकला आहे, तेव्हापासून त्याला भारतीय संघात स्थान देण्याची मागणी जोर धरू लागली आहे. त्याला संघात स्थान दिले गेले, पण पदार्पणाची संधी देण्यात आलेली नाही.



वैभव हा खास खेळाडू आहे, कारण वयाच्या १५व्या वर्षी कुठल्याही खेळाडूला भारतीय संघात स्थान दिले गेले नव्हते. जर वैभवला इतक्या लवकर संघात स्थान दिले गेले, तर प्रस्थापित सिस्टीम पूर्णपणे कोलमडेल आणि उर्वरित डोमेस्टिक सर्किटला एक चुकीचा किंवा गोंधळात टाकणारा संदेश जाईल. भारतीय संघात जे खेळाडू आहेत, त्यांनी वर्षानुवर्षे दमदार कामगिरी करून संघात स्थान मिळवले आहे तसेच गेल्या काही वर्षांपासून संघाचा भाग आहेत. त्यामुळे जर अचानक वैभवला संघात स्थान देण्यासाठी कुठल्याही खेळाडूला बाहेर केले, तर हा त्या खेळाडूवर अन्याय ठरेल, अशी चर्चा आहे.

### ...तर प्लेईंग ११मध्ये

प्रशिक्षक गौतम गंभीरने भारतीय संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदाची जबाबदारी संभाळल्यानंतर एक सिस्टीम तयार केली आहे. ही सिस्टीम त्याला विस्कळीत होऊ द्यायची नाही. हीच सिस्टम फॉलो करून भारतीय संघाने टी-२० वर्ल्डकप, आशिया चषक आणि चॅम्पियन्स ट्रॉफीसारख्या मोठ्या स्पर्धा जिंकल्या आहेत. वैभवला संधी द्यायची असेल, तर एकतर संजू किंवा अभिषेक शर्मापैकी एकाला विश्रांती द्यावी लागेल. नाही तर मग टीम कॉम्बिनेशनमध्ये बदल करावा लागेल. आता टीम मॅनेजमेंट काय निर्णय घेणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com